रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८६ । अंक २५७ । पृष्ठे ८
www.krushival.in

# कृषीवल

रायगड, गुरुवार दि. २३ फेब्रुवारी, २०२३

किंमत ४ ₹



**निवडक**

## पुनाडेत आरोग्य शिबीर

**उरण :** डायबेटीस हेल्थ फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट व श्री रामकृष्ण नेत्रालय व वैभव आय केअर व ऑप्टिकल, पुनाडे येथील सुरेश पाटील यांच्या संयुक्त विद्यमाने उरण तालुक्यातील पुनाडे येथे मोफत आरोग्य शिबीवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ब्लड प्रेशर, मधूमेह,वजन, उंची, डोळे तपासणी आदी तपासण्या करण्यात आले. नागरिकांनी मोठ्या प्रमाणात या आरोग्य शिबीराचा लाभ घेतला कार्यक्रमास प्रशांत पाटील, विनोद म्हात्रे, विनोद जाईलकर उपस्थित होते.

## घरत यांची नियुक्ती

**उरण :** जिल्ह्यात काँग्रेस पक्षाची वाताहत झालेली असतानांही पक्षाशी एकनिष्ठ राहून दिलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडून जिल्ह्यात काँग्रेस पक्षाला नवसंजीवनी देणारे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र घरत यांची अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. विविध संप आंदोलने करून गोरगरिबांना, कामगारांना न्याय हक्क मिळवून दिला. यांच्या नियुक्तीबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## वक्तृत्व स्पर्धा

**कोर्लई :** मुरुडच्या वसंतराव नाईक वसंतराव नाईक महाविद्यालयामध्ये महाविद्यालय व मुरुड-जंजिरा नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती निमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये सर एस ए कनिष्ठ महाविद्यालय, अंजुमन इस्लाम कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय व वसंतराव नाईक महाविद्यालयातील २० स्पर्धकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. यावेळी प्राचार्य डॉ. एम.ए.नगरबावडी, उपप्राचार्य डॉ. विश्वास चव्हाण, दिपाली दिवेकर, पी. के. आरेकर उपस्थित होते.

## गुणदर्शनाचे कार्यक्रम

**खांब-रोहा :** रोहा तालुक्यातील प्राथ.शाळा धामणसई येथे विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आले. येथील सरपंच नेहा जंगम,शा.व्य.समिती अध्यक्षा शर्वरी कदम यांच्या हस्ते कार्यक्रमांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपसरपंच सुशील घाटवळ, दिनेश रटाटे, रमेश शिद, विठोबा भोकटे, नथुराम वरणकर, नथुराम भोकटे, शंकर कदम, सुशील खांडेकर, सचिन कदम, शैला सानप, वंदना कोकळे, गौरक्षा शिर्के, मोठ्या संख्येने ग्रामस्थ व रसिक प्रेक्षक उपस्थित होते.

## मेळाव्याचे आयोजन

**म्हसळा :** येथील कोकण उन्नती मित्र मंडळाच्या वसंतराव नाईक कला,वाणिज्य महाविद्यालय आणि बॅरिस्टर ए.आर.अंतुले विज्ञान महाविद्यालयाच्या १९९०-९१ पासूनच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा शनिवार दि. ४ मार्च, रोजी आयोजित करण्यात आला आहे. सन १९९२-९३ पासून महाविद्यालयातून बी.ए,बी.कॉम. झालेल्या आणि विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी वेळात वेळ काढून आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन महाविद्यालयाने केले आहे.

# स्थानक बनले क्रॉसिंग स्टेशन

## इंदापूरात रेल्वेप्रवासी संख्या रोडावली, स्थानकात एकाच गाडीला थांबा

*। माणगाव । वार्ताहर ।*
***गतिमान प्रवासासाठी कोकण रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करण्यात आले. त्यामुळे आतापर्यंत कोकण रेल्वे एकेरी ट्रॅकवरून दुपदरीकरणामुळे कोकण रेल्वेचा प्रवास अधिक गतिमान झाला. गोवा, मुंबई, कोकण प्रवास करणाऱ्या पर्यटक प्रवाशांसाठी कोकण रेल्वेने मोठी भरारी घेतली आहे. सन २०१७ मध्ये माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांनी इंदापूर येथे कोकण रेल्वे क्रॉसिंग स्टेशनचे भूमीपूजन केले होते.***

त्यावेळी त्यांनी या मार्गावरील देशातील रेल्वे मार्ग गतिमान करण्याबरोबरच कोकण रेल्वे मार्गही प्राधान्याने गतिमान करीत या मार्गांनी ज्यादा रेल्वे गाड्या सोडण्याबरोबरच अतिजलद गाड्याही या मार्गाने धावतील. त्यामुळे कोकणातील पर्यटनाला अधिक चालना मिळेल. या मार्गावरील अतिजलद गाडया सुरू करण्याच्या दृष्टीने कोकण रेल्वेचे आधुनिकिरण करण्याची गरज आहे असे सांगितले होते. त्यानंतर इंदापूरसह अनेक रेल्वे स्टेशनचे आधुनिकीकरण केले.



मात्र इंदापूर येथे रेल्वे स्टेशनकडे जाताना रेल्वे ट्रॅक ओलांडून प्रवाशांना जीव मुठीत धरून जावे लागते. या स्टेशनवर पूर्वी अनेक गाड्यांना थांबा होता. आता या आधुनिकीकरणात एकच रेल्वे गाडी थांबत आहे. त्यांमुळे हे स्टेशन फक्त क्रॉसिंग स्टेशन बनले आहे. त्यामुळे कोकण रेल्वेचा प्रवास प्रवाशांना दुर्मिळ झाला असून प्रवाशांनी इंदापूर रेल्वे स्टेशनकडे पाठ फिरवली असून या अत्याधुनिकीकरणात रेल्वे प्रशासनाने आपले प्रवासीच हरवले आहेत.

दिवा-सावंतवाडी-मडगाव व मडगाव-सावंतवाडी-दिवा हि कोकण रेल्वे १ नोव्हेंबर २०२१ रोजी पासून बंद आहे. इंदापूर रेल्वे स्थानकात सकाळी १०.०० रत्नागिरी-दिवा हि गाडी थांबते. तर दिवा- रत्नागिरी जाणारी हि रल्वे सायंकाळी ६.०० वाजता रेल्वे स्थानकावर थांबते. मात्र या व्यतिरिक्त एकही रल्वे गाडीला थांबा नाही. त्यामुळे हे रेल्वे स्थानक क्रॉसिंग पुरतेच मर्यादित राहिले आहे. या विविध समस्यांमुळे इंदापूर रेल्वे स्थानक नावापुरतेच उरले असून रेल्वे प्रशासनाने याकडे दुर्लक्ष चालवले आहे.

## दिन वार्ता

**पंचांग**
२३ फेब्रुवारी २०२३ गुरुवार
विक्रम संवत्- २०७९
शालिवाहन शके संवत्- १९४४
संवत्सर - शुभकृत्नाम
अयन- उत्तराणायन
मास- फाल्गुन
ऋतु- वसंत
शुक्ल पक्ष
तिथि:चतुर्थी २५:३३:५१+
नक्षत्र:रेवती २७:४४:०९+
योग:शुभ २०:५७:५२
करण:वणिज १४:२३:३१
करण:विष्टि २५:३३:५१+
सूर्य:कुम्भ
चन्द्र:मीन
हिजरी सन् - १४४४
मुस्लिम मास - शाबान
तारीख - २
विशेष
विनायक चतुर्थी
संत गाडगेबाबा जयंती

**संस्कृत सुभाषित**
वासनाना क्षयश्चात स्वाध्मासापनमं करू
अर्थ मन निरंतर स्वस्वरुपीच राहून लयास जाते आणि त्यामुळेच वासनांचा क्षय होतो. म्हणून मनोविजय प्राप्त कर असे सांगितले आहे.

## पोपटीसाठी गावठी वालांच्या शेंगांना पसंती

**। तळा । वार्ताहर ।**
तालुक्यात सध्या वालाच्या शेंगांचा हंगाम सुरू झाला आसून गावठी वालाच्या शेंगा बाजारात येऊ लागल्याने ग्राहकांकडून खरेदीसाठी गर्दी होत आहे. वालाच्या शेंगा व चवळीच्या शेंगांसाठी थंडीचा हंगाम खूप उपयुक्त आहे. थंडीत पडणाऱ्या दवावर हे पीक तयार होते. जेवढी जास्त थंडी, तेवढे हे पीक मोठ्या प्रमाणावर येते. दरम्यान, सदरील पिके तयार होण्यासाठी चार महिन्यांचा कालावधी लागतो.

तालुक्यातील गिरणे, नानवली, निगुडशेत, वावे, राणेची वाडी या परिसरातील हे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. या पिकासाठी जास्त मेहनत करावी लागत नाही.



परंतु, या पिकाचा सुगंध वन्य प्राण्यांना आकर्षित करत असतो. वालाची झुडपे हे जंगली वानरे आणि रानटी डुकरे तसेच गुरे यांचे आवडते खाद्य असल्यामुळे या प्राण्यांपासून पिकांचे रक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना खूप मेहनत घ्यावी लागते.

सध्या पोपटी करण्याचा हंगाम सुरू झाला असून, लोक गावठी हिरव्यागार वालाच्या शेंगांची खरेदी करण्यासाठी बाजारपेठेसह परिसरातील गावागावात येत आहेत. सध्या वालाच्या व चवळीच्या गावठी शेंगांना प्रचंड प्रमाणावर मागणी असून, येथे चवळीच्या शेंगांचा एका किलोचा दर शंभर रुपये तर वालाच्या शेंगांचा एका किलोचा दर एकशे वीस रुपये असा आहे. तरीही खरेदी करण्यास येणारे बाहेरचे ग्राहक आनंदाने या शेंगांची खरेदी करत असून, गावठी वालाच्या शेंगांची विशिष्ट प्रकारची चव चाखत आहेत.

## चाईल्ड केअरतर्फे आर्थिक मदत

**। उरण। वार्ताहर।**
चाईल्ड केअर सामाजिक संस्था उरण, रायगड या सामाजिक संस्थेने मानव विजय ठाकूर (केळवणे, पनवेल) या मुलाच्या आजारासाठी आर्थिक मदतीचे आव्हान सोशल मीडियाच्या माध्यमातून जनतेला केले होते. त्याला जनतेनी चांगला प्रतिसाद दिला. रविवारी केळवणे येथे मानस ठाकूरच्या घरी जाऊन आजाराबाबत विचारणा केली व यावेळी मुलाच्या पुढील उपचारासाठी आर्थिक मदत केली. आर्थिक मदत मुलाच्या आई वडिलांकडे सुपूर्द केली. यावेळी विकास कडू, विठ्ठल ममताबादे, विक्रांत कडू, तुषार ठाकूर, आमोल डेरे, रोशन धुमाळ विवेक कडू उपस्थित होते.



## सुडोकू

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 7 | | 4 | | 2 | 6 | | |
| | | | | | 6 | 3 | 7 | |
| 9 | | | | 3 | 7 | | | 8 |
| 8 | | 6 | 9 | 2 | 3 | 5 | | |
| | | | 6 | | 8 | | | |
| | | 2 | 7 | 5 | 1 | 8 | | 6 |
| 5 | | | 8 | 6 | | | | 2 |
| | 3 | 9 | 2 | | | | | |
| | | 7 | 3 | | 4 | | 6 | |

**बुधवारच्या अंकातील कोड्याचे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 8 | 5 | 3 | 1 | 7 | 4 | 9 | 2 |
| 2 | 3 | 1 | 4 | 5 | 9 | 7 | 6 | 8 |
| 4 | 7 | 9 | 8 | 6 | 2 | 3 | 1 | 5 |
| 7 | 2 | 3 | 1 | 9 | 4 | 8 | 5 | 6 |
| 1 | 4 | 6 | 5 | 2 | 8 | 9 | 7 | 3 |
| 9 | 5 | 8 | 6 | 7 | 3 | 2 | 4 | 1 |
| 5 | 9 | 4 | 2 | 8 | 6 | 1 | 3 | 7 |
| 8 | 1 | 7 | 9 | 3 | 5 | 6 | 2 | 4 |
| 3 | 6 | 2 | 7 | 4 | 1 | 5 | 8 | 9 |



## उणेगाव मुंबई बस सुरु

**। माणगाव । वार्ताहर ।**
माणगाव तालुक्यातील महत्वाच्या गोरेगाव-उणेगाव या मार्गावरील अनेक गावातील ग्रामस्थांनी माणगाव बस आगार प्रमुख चेतन देवधर यांचेकडे गोरेगाव उणेगाव मार्गे मुंबई हि बस सुरु करावी अशी मागणी केली होती. या भागातील अनेक ग्रामस्थ व तरुण वर्ग विविध कामानिमित्त मुंबई येथे स्थायिक झाला आहे. त्यांचे सततचे येणे जाणे गावाकडे शेतीवाडी व नातेवाईक असल्यामुळे चालू असते.

या मार्गावर बस नव्हे तर अन्य कोणतेही वाहन नसल्यामुळे प्रवाशांची मोठी कुचंबणा होत होती. या मागणीचा विचार करीत बस आगार प्रमुख यांनी गोरेगाव -उणेगाव मार्गे मुंबई तसेच परतीची मुंबई उणेगाव गोरेगाव ही बस सुरु केल्यामुळे असंख्य प्रवाशांचा प्रश्न सुटला असल्याने ग्रामस्थांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे. माणगाव बस आगार प्रमुख चेतन देवधर याचे या भागातील ग्रामस्थ व प्रवाशांनी आभार मानले आहेत.

## नगरपालिका झाल्यास विकासाला चालना

**। रसायनी । वार्ताहर ।**
रसायनी हा औद्योगिक परिसराने वेढलेला भाग आहे. या परिसरात विविध धंदे व कारखाने आहेत. रसायनी पाताळगंगा परिसरातील भविष्यातील गरजा लक्षात घेता मोहोपाडा नगरपालिका अस्तित्वात येणे ही काळाची गरज आहे. या भागातील ग्रामपंचायतीचा ताण कमी होवून महसूल उत्पन्नात मोठी वाढ होईल असे रसायनीकरांचे म्हणणे आहे. रसायनी-पाताळगंगा औद्योगिक वसाहतीमुळे अनन्य साधारण महत्व आहे. मोहोपाडा-रसायनी हा खालापूर, कर्जत, पेण व पनवेल या चारही तालुक्यांचा मध्यवर्ती भाग असल्याने गेल्या काही वर्षात परिसराची लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे. परंतु अत्यावश्यक सोयी सुविधांची कमतरता असल्याने वासांबे, मोहोपाडा, चांभार्ली, वडगाव, गुळसुंदा, आपटा, सावळे, देवळोली या ग्रामपंचायती मिळून नगरपालिका झाल्यास विकासाला चालना मिळेल असे जाणकारांचे मत आहे.

दरम्यान सातही ग्रामपंचायतींची भौगोलिक रचना तसेच लोकसंख्या पाहता रसायनी नगरपालिका होण्यास कोणतीही अडसर नाही. शिवाय कासप परिसरात सुरू असणारे पन्नासपेक्षा जास्त कारखान्यांचे काम पाहता रसायनी परिसराच्या लोकसंख्येत प्रचंड वाढ होणार आहे. यात वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायतीची लोकसंख्या जवळपास ६४००० हजार आहे. त्यामुळे वाढत्या लोकवस्तीला आवश्यक सोयीसुविधा पुरवताना ग्रामपंचायती. कमी पडणार आहेत. मोहोपाडा नगरपालिका झाल्यास त्या परिसराचा कायापालट होवून कोट्यवधीचा महसूल मिळणार आहे.

## कर्मचारी निवृत्ती वेतन योजनेचा लाभ घ्या

**। मुंबई । प्रतिनिधी।**
सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार महावितरणमधील जे कर्मचारी १ सप्टेंबर २०१४ रोजी कर्मचारी निवृत्ती वेतन योजना - १९९५ या योजनेचे सदस्य आहेत. तसेच या योजनेंतर्गत निवृत्ती वेतन प्रत्यक्ष वेतनावर घेण्यासाठी इच्छूक आहेत, अशा कर्मचाऱ्यांनी आपला अर्ज संबंधित कार्यालयांमध्ये जमा करावे, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात येत आहे.

. सन १९९५ पासून सर्व कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या भविष्य निर्वाह निधी बाबतची सर्व माहिती सचिव, म.रा. वि. मंडळ, भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ या विभागाकडून त्यांच्या पोर्टलवर (https://cpf1.mahadiscom.in/CpfWebProject/) CPF HR Report मध्ये उपलब्ध करण्यात आलेली आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाने दि.१ सप्टेंबर २०१४ पूर्वी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी निवृत्ती वेतनासंबंधीचा पर्याय निवड करण्याकरिता संयुक्त पर्यायी नमुना अर्ज त्यांचे portal (https://unifiedportal-mem.epfindia.gov.in/member Interface Pohw/) वर जाहीर केलेला आहे. महावितरण कंपनीमधील भविष्य निर्वाह निधी अधिनियमानुसार निवृत्ती वेतनास पात्र असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना निवृत्ती वेतन योजनेअंतर्गत माहिती, नव्याने लागू होणाऱ्या निवृत्ती वेतन संदर्भात माहिती, संबंधित कर्मचाऱ्यास निवृत्ती वेतन योजनेकरिता भरावी लागणारी अंदाजित रक्कम आणि नव्याने लागू होणारी निवृत्ती वेतनाची अंदाजित रक्कम इत्यादी बाबतची माहिती सीपीएफ़ पोर्टलवर उपलब्ध आहे.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**



कै. श्री. श्रीकांत केशव ठाकूर, समर्थ कुसुंबळे, अलिबाग

## शिवकालीन जाधवांच्या समाधीचा शोध

*। सुधागड-पाली । वार्ताहर ।*
***सुधागड किल्ल्याचे प्रतिष्ठेचे समजले जाणारे सरनाईक पद लाभलेले जाधव घराण्यातील वीर पुरुष सरनाईक मालजी अतोजी जाधव यांची मौजे धोंडसे या गावी जमिनीमध्ये मातीखाली पूर्णतः दबलेल्या अवस्थेत असलेल्या समाधीचा शोध लागला आहे. दहिसर-मुंबई येथे राहणारे इतिहास संशोधक संदीप परब हे गेली पाच वर्षे समाधी शोधण्याचे काम करीत होते.***




सदर समाधी ही जमिनी खाली दबलेल्या अवस्थेत असून समाधीचे उत्खनन होऊन पुढील संशोधनास चालना मिळावी यासाठीही त्यांनी लिहिलेला शोधनिबंध सरनाईक मालजी अतोजी जाधव यांची मौजे धोंडसे येथील समाधी-एक अभ्यास कोकण इतिहास पत्रिकेच्या जानेवारी-मार्च २०२३ च्या अंकात प्रकाशित करून इतिहास प्रेमी, अभ्यासक व संशोधक यांच्या समोर त्यांनी मांडला आहे.

सरनाईक मालजी अतोजी जाधव यांनी मौजे धोंडसे येथील यांनी सुधागड जिकंण्याकामी जो पराक्रम केला त्यावेळी त्यांच्या सोबत मौजे तिवरे येथील सरदार संभाजी हैबतराव देशमुखही होते. या संदर्भातील उल्लेख भोर संस्थांच्या इतिहासात आलेला आहे. तसेच गडावर असलेल्या भोराई देवीच्या मंदिराच्या व्यवस्थेविषयी संपूर्ण जबाबदारी ही त्यांचीच होती या संदर्भातील ऐतिहासिक पत्र परब यांना शोधण्यात यश मिळाले आहे .

सुधागड किल्ला हस्तगत करण्याकामी केलेला पराक्रम, मौजे धोंडसे गाव इनाम मिळाल्याचे इनामपत्र, गडावरील भोराई देवीच्या मंदिराच्या व्यवस्थेसंदर्भातील पत्र, धोंडसे गावात वास्तव्यास असलेले त्यांचे वंशज या सर्वाचा आधार घेऊन सदर समाधी ही त्यांचीच असल्याचे परब यांनी या सर्व बाबींचा आधार घेऊन सिद्ध केले आहे.

## शब्दकोडे क्र.४७



**आडवे शब्दः** १. मंदिर ४. सुखरूप ८. समोर उभा ठाकलेला ११. नाशिकजवळचे शक्तीपीठ १२. विष १३. समुद्रातील अग्नी १५. आस्था, कळकळ १६. विष्णूची पत्नी १७. नियंत्रण, कब्जा १९. हस्तक्षेप २२. खानेसुमारी २५. पवित्र २६. अवस्था २८. वीज २९. पारंगत ३२. ऊबदार पांघरूण ३३. चहाडी ३४. उपवासाचे तांदूळ ३६. टंचाई ३८. गोड ३९. संधी ४०. रोजचा कार्यक्रम ४२. जमीन ४४. बाळसे वेगळे आणि ही निराळी! ४६. देशी पिस्तूल ४७. लगेच ४९. उत्कर्ष ५२. जाणकार ५४. सगळे ५६. गायबफ ५८. हातफ ५९. ऐकायला सुमधुर ६१. नागरिक ६२. दिमाख ६४. पंख ६६. आश्रय ६७. घाईघाईने ६९. माळ, हार ७०. महिमा, माहात्म्य ७२. प्राण ७३. आंधळा ७४. रमलेला ७५. लायसेन्स ७७. कृष्णाची दुष्ट 'मावशी' ७९. अंत:करण ८०. परीट ८२. विधिवत, कायदेशीर ८४. तांब्या ८६. ताडापासून मिळणारे शीतपेय ८८. व्यवस्था ९३. तुच्छ, गौण ९५. उत्साहाचा अभाव ९६. विसराळू ९७. केळी, साखर व दुधाचे मिश्रण ९८. सामायिक खर्चातील सहभाग ९९. खुर्ची १००. याचक १०१. उजेड १०२. जसा १०३. आकाश १०४. अनेक कौशल्ये असलेला १०५. ओझे

**उभे शब्द** १. 'काही बोलायचे आहे, पण बोलणार नाही ----' (कुसुमाग्रज) २. व्यापारी ३. धनी, मालक ४. चुलीतील इंधन ५. फावला वेळ ६. प्रिय व्यक्तीच्या इच्छा पुरवणे ७. नेमस्त ७अ. शरीर ९. मुक्त १०. घाणेरडे १४. झुंजार १५. आगमन, प्रवेश १६. चंद्र १८. कापडी तंबू २०. जंगल २१. मेघ २३. बभ्रा २४. फजिती २७. शिवणकामाचे साहित्य ३०. ओल्या कागदाचा लगदा ३१. चोळीचे कापड ३५. सूर्य ३६. चेहरा ३७. कंटाळवाणी गोष्ट ३९. गणती ४१. भाजल्याचा डाग ४२. वित्त ४३. बायको ४५. अंगीकर ४७. संधी ४८. अपक्व ५०. ही नऊ प्रकारे करता येते ५१. कपडे अंगाबेताचे करण्यासाठी घातलेला टाका ५३. थंड ५४. नवऱ्याची दुसरी बायको ५५. वागण्याला असलेली मर्यादा ५७. रेल्वेचा असल्यास पहिला-दुसरा ६०. कालानुक्रमानुसार ६२अ. क्रोध ६३. रंगवलेले ६४. अनुमती ६५. पर्याप्त, विपुल ६८. उत्कर्ष ६९. डिंकाचा एक प्रकार ७१. अंगठा आणि करंगळीतील कमाल अंतर ७३. मारुतीची आई ७६. आवाज ७८. घ्राणेंद्रिय ८१. शत्रूला सामील झालेला ८३. 'खाली डोके वर पाय' असे आसन ८५. प्रेमात पडलेला ८७. रखवालदार ८९. रम्य ९०. पाषाण ९१. आसपास ९२. चाकरी ९४. नवी पालवी, तारुण्य ९६. विस्मरण ९७. शिकार करणारा ९९. स्वत:ची पत १००. निराळे

## शब्दकोडे क्र.४६ चे उत्तर

**आडवे उत्तर**
१.थोराघरचे श्वान त्याला सर्व देती मान ११.चांदी १२.रस १३.नर १४.डर १५.वारस १६.नग १७.लागवड १९.मनुका २१.घण २२.लाडावलेला २५.रक्षणे २८.घेणे २९.कर ३०.अंबा ३१.कसाबसा ३३.पारवा ३५.देश ३७.कमळ ३८.जनमत ४०.वरवरचे ४२.जवळ ४४.सबब ४७.काल ४८.मला ५०.नजरानजर ५२.रातराणी ५४.तहहयात ५७.हवा ५८.धडा ६०.पातळ ६१.लहरीबहरी ६५.खसखस ६७.बस ६८.दयावान ६९.टर ७०.माल ७१.मध ७२.रनर ७४.हरळी ७६.सवालजबाब ७९.सडकून ८२.कसरत ८३.राम ८४.दरदाम ८७.कमरकस ८८.पाक ८९.फारसा ९१.सवा ९२.महाग ९४.दास ९५.रातोरात ९६.वखार ९७अ.देय ९८.सीता ९९.शीतल १०२.परत १०४.तहान १०५.तळमळ १०६.लता मंगेशकर

**उभे उत्तर**
१.थोरला २.रासगरबा ३.रगडणे ४.श्वान ५.नरम ६.लाडका ७.सर ८.देवाणघेवाण ९.तीर १०.मासला ११.चांगले १६.नवरदेव १८.वक्ष २०.नुकसान २३.डाक २४.लाज २६.मासा २७.कपात ३०.अंदाज ३१.कळस ३२.बजबजपुरी ३४.सवलत ३६.शरम ३७.कळ ३९.मनन ४१.चेला ४३.वसाहत ४५.बन ४६.हिरवा ४७.कारावास ४९.छाया ५१.जहरी ५३.रावस ५४.तपासनीस ५५.हळदकुंकू ५६.तलवार ५८.धबधबा ५९.डास ६२.हनन ६३.बट ६४.हरहर महादेव ६५.खल ६६.खडावा ७०.माळी ७१.मज ७३.रकम ७५.वात ७६.समरसता ७७.लग्नसराई ७८.बरकत ८०.डबर ८१.नद ८३.रामदासी ८५.रसरशीत ८६.दावा ८८.पारावार ८९.फारकत ९०.सावधान ९३.गय ९७.कलम १००.तळ १००अ. कोता १०१.पाश १०२.पर १०३.तरू

कृषीवल

रायगड, गुरुवार दि. २३ फेब्रुवारी, २०२३

किंमत ४ ₹

## छबिनोत्सवातून उलाढाल



पान ६ वर

## कोकण विभागीय जलतरण चषक स्पर्धा उत्साहात



पान ८ वर

# शहापूर, धेरंडला उधाणाचा तडाखा

। शहापूर । वार्ताहर ।

**शहापूर परिसराला पुन्हा उधाणाचा तडाखा बसला आहे. दोन दिवसांपासून (२० फेब्रुवारी) सुरु झालेल्या उधाणांचे पाणी शहापूर व धेरंड गावाच्या पूर्वेस घरामध्ये रात्रीच्या वेळेस शिरून खूप नुकसान झाले आहे. पाणी रात्रीच्या वेळेसच घरांच्या पायरीपर्यंत मोठ्या प्रमाणात येत असल्याने येथील रहिवाशी कमालीचे वैतागले आहे. गाव परिसरातील मत्स्य तलावात पाणी शिरून मासे वाहून गेले आहेत. या साऱ्या प्रकाराला ग्रामस्थ कमालीचे संतप्त झाले असून, सरकारने यावर कायमस्वरुपी तोडगा काढावा अन्यथा गावातील कायदा, सुव्यवस्था धोक्यात येण्याचा इशारा श्रमिक मुक्ती दलाने दिला आहे.**

**सततच्या खाऱ्या पाण्याने महिला संतप्त**

**२३ घरात पाणी शिरले**

मंगळवारी रात्री २३ घरांसहीत निवृत्त शिक्षक श्री.प्रभाकर नारायण पाटील व सौ. कुसुम वय वर्षे ८२ यांचे घरात पाणी शिरून सर्व कागदपत्रे रू.१लाख तसेच घरातील वस्तूंचे खूप नुकसान झाले असल्याचे श्रमिक मुक्तीदलाचे राजन भगत यांनी एका निवेदनाद्वारे सुचित केलेले आहे.





शहापूर येथील बंधारा १ ऑगस्ट २०२१ रोजी फुटला होता. त्या घटनेला आता ५६० दिवस झाले तरी बांधला नाही. पान ५ वर

***पुढील उधाण होळीला***

*पुढचे होळीचे उधाण या पेक्षा दीड पट मोठे आहे. पाणी नेमके रात्री जास्त येते. किमान ५०० एकर जमीन जी संपादनामध्ये नाही ती देखील नापीक होणार आहे. महिला वर्ग संतप्त झाल्या आहेत. प्रशासनाच्या बैठकांवर जनतेचा विश्वास राहिलेला नाही कधीही कायदा सुव्यवस्था कधीही धोक्यात येऊ शकते. असा इशाराही भगत यांनी दिला आहे.*

# खारबंदिस्तीबाबत नौटंकी बंद करा

## पंडित पाटील यांची मागणी; परिसराची पाहणी

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

शहापूर, धेरंडला बसलेल्या उधाणाने गावातील शेती, तलाव तसेच घरांमध्ये शिरल्याने येथील शेतीसह मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. यासाठी शासनाने कुठल्याही प्रकारची नौटंकी न करता तातडीने पावसाळ्यापूर्वी या समस्येवर तोडगा काढावा, अशी मागणी माजी आ. पंडित पाटील यांनी केली आहे.



उधाणाची माहिती मिळताच पंडित पाटील यांनी तातडीने धेरंड, शहापूरचा दौरा करुन परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासमवेत माजी जि.प.सदस्या भावना पाटील, सुधीर थळे, सतीश म्हात्रे, अनिल म्हात्रे, ॲड. कुंदन पाटील, राजेंद्र पाटील, अजित पाटील, मंगेश पाटील, नीलम पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी पंडित पाटील यांनी सतत होणाऱ्या या उधाणामुळे गावकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली. एमआयडीसी आणि खारलॅन्ड विभाग या समस्येबाबत खो खो खेळत आहे तो तातडीने बंद करावा आणि कायमस्वरुपी बंधारा उभारावा, अशी मागणीही त्यांनी केली. या बंधाऱ्यासाठी ६५ लाखांचा निधी मंजूरही झालेला आहे. यासंदर्भात आपण प्रांत तसेच एमआयडीसीचे अधिकारी यांच्याशी चर्चाही केलेली आहे. त्यांनी सकारात्मक प्रतिसादही दिलेला आहे. पान ५ वर

## वेधक

### नेरळमध्ये मोबाईल शॉप फोडले

**नेरळ :** नेरळ जुनी बाजारपेठेतील सॅमसंग मोबाईल वर्ल्ड या मोबाईल शॉपचचे शटर फोडून अज्ञात चोरट्यांनी साडे नऊ लाखाचा मुद्देमाल हा लांबविला आहे. सदर चोरटा हा चोरी करताना सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे. सरकारी रेशन दुकानासमोर सॅमसंग मोबाईल वर्ल्ड या मोबाईल विक्रीचे दुकान आहे. एक चोरटा त्या मोबाईल दुकानाचे शटर फोडून आत शिरला आणि दुकानातील विविध कंपन्यांचे जुने आणि नविन मोबाईल हे आपल्या सोबत नेले. त्याचवेळी काही वस्तू देखील नेल्या आहेत.सकाळी दुकानाचे मालक हे दुकान उघडण्यासाठी आले असता त्यांना आपल्या दुकानात चोरी झाल्याचे लक्षात आले.त्यांनी त्याबाबत नेरळ पोलीस ठाणे यांना कळविले आणि त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत चोरी झालेल्या वस्तूंचा पंचनामा केला.

### पोलीस भरतीसाठी आलेल्याचा मृत्यू

**मुंबई :** पोलीस भरतीसाठी घेण्यात आलेल्या मैदानी चाचणीनंतर अस्वस्थ वाटू लागलेल्या तरूणाचा हॉटेलमध्ये मृत्यू झाल्याचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस ठाण्यात अपमृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अमर अशोक सोलके (२४) असे मृत तरूणाचे नाव असून तो अमरावती येथील नवसारीतील रहिवासी आहे. तो पोलीस भरतीच्या मैदानी चाचणीसाठी मुंबईत आला होता.

### वृद्धेच्या हत्येप्रकरणी तिघे अटकेत

**माणगाव :** म्हसेवाडी येथील संगिता श्रीरंग सावंत (वय ६९) या वृद्धेच्या हत्येप्रकरणी माणगाव पोलिसांनी तिघा संशयितांना ताब्यात घेतले आहे. ही महिला एकटीच असताना आरोपींनी सावंत यांची मान पकडून तोंड व नाक पाण्याने भरलेल्या टपात बुडवून तिचा श्वासोच्छवास बंद करून तीच्या सोबत झटापटी केली. तसेच सोन्याच्या कुडी हाताने जबरदस्तीने खेचून कानाच्या पाळी फाडून रक्तबंबाळ केले. गळ्यातील सोन्याची माळ जबरदस्तीने तोडून व हातातील सोन्याच्या चार बांगड्या चोरून महिलेची हत्या केली. एकूण तीन लाख रुपयांचा सोन्याचा ऐवज लुटून पोबारा केला उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार सूर्यवंशी, पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, मोहिते, महिला पोलीस उपनिरीक्षक अस्मिता पाटील यांनी घटनास्थळी भेट दिली. या प्रकाराने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. अधिक तपास सुरु आहे.

## रायगडच्या आपत्ती निवारणासाठी

# ९९६ कोटींचा निधी

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी रत्नागिरीसह पाच जिल्ह्यांसाठी २ हजार ८४३ कोटींचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती राज्याचे उद्योगमंत्री तथा रत्नागिरी-रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

> रायगड जिल्ह्याला मिळालेल्या ९९६ कोटींपैकी धूपप्रतिबंधक बंधाऱ्यांसाठी १५० कोटी, बहुउद्देशीय निवारा केंद्रासाठी १५०, भूमिगत विद्युत वाहिन्यांसाठी ७०० कोटी रुपये मंजूर झाले आहेत.
>
> - उदय सामंत, पालकमंत्री

यात ठाणे १८८ कोटी, पालघर २८३ कोटी, रायगड ९९६, रत्नागिरी ७०० कोटी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी ६७७ कोटी यांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले.

सामंत म्हणाले, गेल्या अडीच वर्षातील सरकारने नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांसाठी कुठलाच निधी दिला नव्हता.

## अमित शहा यांच्या वक्तव्याविरोधात

# अलिबाग शिवसेनेमध्ये संताप

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या विरोधात अर्वाच्च शब्द प्रयोग केला. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील ठाकरे गटाचे शिवसैनिक आक्रमक झाले आहेत. अमित शहा यांच्याविरोधात शिवसेनेमध्ये संताप निर्माण झाला असून त्यांनी निषेध व्यक्त केला. अमित शहा यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे केली आहे. याबाबत ठाकरे गटातील शिवसेना जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी निवेदन देऊन तक्रार दाखल केली आहे.



यावेळी मुरुड तालुका प्रमुख नौशाद दळवी, अलिबाग शहर प्रमुख संदीप पालकर, सतिश पाटील, मारुती भगत, रुपेश जामकर, अमिर ठाकूर, बाबु सय्यद, अजित गुरव, अजित मिसाळ आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी कोल्हापूर येथील एका जाहीर सभेत महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, पान ५ वर

# पुन्हा एकदा ‘आनंद शिधा’

। मुंबई । प्रतिनिधी ।

गुढीपाडवा, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त राज्यातील शिधापत्रिकाधारकांना १०० रुपयांत ‘आनंदाचा शिधा’ देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

बुधवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. याचा लाभ १ कोटी ६३ लाख शिधा पत्रिकाधारकांना होईल. यापूर्वी दिवाळीत हा ‘आनंदाचा शिधा’ देण्यात आला होता. अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटुंब तसेच औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व आणि




नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेवरील केशरी शेतकरी शिधा पत्रिकाधारकांना १ किलो रवा, १ किलो चनाडाळ, १ किलो साखर आणि १ लिटर पामतेल असा आनंदाचा शिधा गुढी पाडव्यापासून पुढील १ महिन्याच्या कालावधीसाठी ई-पॉसद्धारे १०० रुपये प्रतिसंच असा सवलतीच्या दरात दिला जाईल.

# काशिद, दिघी, रेवससाठी रो रो सेवा लवकरच

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

राज्यात सागरमाला अंतर्गत सुरू असलेले प्रकल्प वेळेत पूर्ण करतानाच नवीन प्रकल्पांसाठी राज्य शासनाकडून मागणी करण्यात येईल. महाराष्ट्रात पुढील दीड वर्षांत रो-रो सेवेचे चार प्रकल्प सुरू करण्यात येतील त्यामध्ये मुंबई ते मोरा, मुंबई ते काशीद, मुंबई ते दिघी, मुंबई ते रेवस कारंजा यांचा समावेश आहे.

केंद्रीय जहाज व परिवहन मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. यावेळी राज्यातील बंदर, नौकानयन, सागरमाला या प्रकल्पांबाबत चर्चा झाली. केंद्र आणि राज्य शासनामार्फत महाराष्ट्रातील प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासंदर्भात यावेळी सविस्तर चर्चा झाली. वर्षा निवासस्थानी झालेल्या या बैठकीस केंद्रीय जहाज व परिवहन सचिव सुधांश पंत, मुंबई पोर्ट ट्रस्टचे अध्यक्ष राजीव जलोटा, जेएनपीटीचे अध्यक्ष संजय सेठी, मुंबई मेरीटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित सैनी आदी अधिकारी उपस्थित होते.

लोथल येथे साकारत असलेल्या राष्ट्रीय सागरी वारसा पान ५ वर

# आ. साळवींची आठ तास चौकशी

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

ठाकरे गटाचे राजापूरचे आमदार राजन साळवी आज अलिबाग येथे लाच लुचपत कार्यालयात चौकशीला सामोरे गेले. यावेळी आमदार साळवी यांची आधिकाऱ्यांनी आठ तास चौकशी केली. दुपारी १२ नंतर चौकशीसाठी आत गेलेले आमदार साळवी रात्री आठ नंतर बाहेर आले.

साळवी यांच्या मालमत्ते बाबत काही कागदपत्र सादर करण्यात विभागाने सांगितली होती. त्यानुसार साळवी हे आज बुधवार २२ फेब्रुवारी पान ५ वर

## केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयाला

# स्थगिती देण्यास नकार




। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

सर्वोच्च न्यायालयाने शिवसेना हे पक्षनाव तसेच धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह शिंदे गटाला बहाल केले आहे. निवडणूक आयोगाच्या या निर्णयास स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी नकार दर्शविला आहे.

ठाकरे गटाने दाखल केलेल्या याबाबतच्या याचिकेवर आज (२२ फेब्रुवारी) सुनावणी पार पडली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने शिंदे गटाल प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच आगामी सुनावणीपर्यंत शिवसेना पक्षाकडून व्हीप जारी केला जाणार नाही, असे आश्वासन शिंदे गटाकडून देण्यात आले आहे. दोन आठवड्यानंत या याचिकेवर पुन्हा एकदा सुनावणी घेतली जाईल.

सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या निकालात हस्तक्षेप करण्यास तूर्तास नकार दिला आहे.

**ठाकरे गटाच्या आमदारांना संरक्षण**

**निवडणूक आयोगाने शिंदे गटाला शिवसेना म्हणून मान्यता दिलेली आहे. त्यामुळे आगामी अधिवेशनात व्हीप जारी करण्यात आला, तर ठाकरे गटाचे आमदार अपात्र ठरू शकतात, अशी भीती ठाकरे गटाचे वकील कपिल सिब्बल यांनी व्यक्त केली. मात्र शिंदे गटाने पुढील दोन आठवड्यांसाठी असा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही, असे आश्वासन दिले आहे. त्यामुळे आगामी दोन आठवड्यांसाठी ठाकरे गटातील आमदारांना एका प्रकारे संरक्षणच मिळाले आहे.**

# पक्ष, चिन्ह शिंदेंना देण्यामागे मोठी शक्ती

। चिंचवड । प्रतिनिधी ।

शिंदे गटाला शिवसेना पक्ष आणि चिन्ह देण्यामागे मोठ्या शक्तीचा हात? शरद पवार म्हणाले, याच्या पाठीमागे मोठी शक्ती असल्याची शंका राष्ट्रवादीचे अध्यक्ष खा.शरद पवार यांनी व्यक्त केली.



चिंचवड येथे प्रचारसभेत बोलताना पवारांनी अप्रत्यक्षपणे मोदी सरकारकडे अंगुली निर्देश केले. निवडणूक आयोगाने पक्षाचं नाव आणि चिन्ह दुसऱ्यांना देण्याचा निर्णय आजपर्यंत कधी या देशात झाला नाही. निर्णय कोण घेतं याची शंका आमच्या मनात आहे. निवडणूक आयोग निर्णय घेतो की, त्यांना कोणाचं मार्गदर्शन आहे.अशी शंकाही उपस्थित केली. यापूर्वी अनेकदा पक्षात फुटी झाल्या. पण असे प्रकार यापूर्वीही कधीही घडलेले नसल्याचे शरद पवार यांनी निर्दशनास आणले.







## न.पा. प्रशासनाची चर्चा सुरु

# घोडेवाल्यांचा संप, माथेरानला सन्नाटा

*। नेरळ । प्रतिनिधी ।*

*माथेरान येथे सुरु असलेले अश्वपालक यांचे गेल्या दोन दिवसांपासून सुरु असलेले आंदोलन बुधवारी तिसऱ्या दिवशी देखील सुरूच आहे. यामुळे नेहमी घोड्यांच्या टापांच्या आवाजाने भरुन जाणाऱ्या माथेरानमध्ये सन्नाटा पसरला असल्याचे जाणवत आहे.*



नगरपरिषदेने नगरपरिषद आणि अश्वपालक यांचे प्रतिनिधी यांनी सात पॉइंट सर्कलची पाहणी केली. तर या संपामुळे माथेरानमध्ये आलेल्या पर्यटकांचे मोठे हाल होत असून कुटुंबासह पायपीट करणाऱ्या पर्यटकांचे हाल होत आहेत. पर्यटकांचा वाहतुकीचा पर्याय असलेल्या घोड्यांना नव्याने बनविण्यात आलेल्या आणि येत असलेल्या पर्यावरण पान ५ वर






# भाजपचा एअरो शो

बंगळुरुमध्ये अलिकडेच एअरो शो पार पडला. देशोदेशींच्या विमान कंपन्या त्यात सहभागी झाल्या होत्या. या निमित्ताने विमानांच्या चित्तथरारक कसरती झाल्या. देशात आणि महाराष्ट्रात भाजपचाही असाच एअरो शो चालू आहे. सत्तेची उंचच उंच उड्डाणे आणि कसरती त्यात पाहायला मिळत आहेत. देशातील १४० कोटी लोक भाजपच्या कसरतींवर खूष आहेत, असा पंतप्रधानांचा दावा आहेच. त्यामुळे तो खरा असला पाहिजे. दहा दिवसांपूर्वी नाशिकमध्ये राज्य भाजपची बैठक झाली. त्यात राज्यातत दोनशे आणि लोकसभेच्या ४५ जागा जिंकण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. दोन दिवसांपूर्वी गृहमंत्री अमित शाह यांचा मोठा दौरा झाला. लोकसभेच्या सर्व म्हणजे ४८ जागा जिंकणार असं त्यांनी जाहीर केलं. तसं झालं तर गेल्या साठ वर्षांमध्ये नेहरू-गांधी आणि काँग्रेसला न जमलेला विक्रम भाजपच्या नावावर जमा होईल. इंडिया टुडेतर्फे अलिकडेच करण्यात आलेल्या सर्वेक्षणाचे निष्कर्ष मात्र वेगळेच होते. महाविकास आघाडी एकत्र लढली तर तिला ४८ पैकी ३४ जागा मिळतील असे त्यात म्हटले होते. अलिकडेच अंधेरी पोटनिवडणुकीमध्ये आरंभी भाजप अतिशय त्वेषाने उतरला होता. सेनेचे निवडणूक चिन्ह काढून घेण्यासाठी त्याने आकांडतांडव केलं. सेनेच्या उमेवाराला अर्ज दाखलच करता येऊ नये असा प्रयत्न झाला. नंतर वातावरण आपल्या विरोधात आहे असं लक्षात येताच माघार घेतली. आता कसबा आणि चिंचवड पोटनिवडणूकही पक्षाला जड जाते आहे. अन्यथा, नाकातोंडात नळ्या असलेल्या गिरीश बापटांना प्रचारात आणण्याची गरज पडली नसती. चिंचवडमध्ये जगतापांच्या कुटुंबात उमेदवारी आहे तर कसब्यात टिळकांच्या कुटुंबियांना का नाही असा प्रश्न उघडपणे विचारला जातो आहे. हा असंतोष पुण्यापुरता मर्यादित राहणारा नाही. पहाटेच्या शपथविधीपासून ते एकनाथ शिंदे यांना फोडण्यापर्यंत जे उपद्व्याप केले गेले त्यावर खुद्द भाजपचेच मतदार नाराज आहेत. मोदींपासून ते खालपर्यंत सर्व नेते मोठमोठी भाषणे करतात, पण प्रत्यक्षात काही मिळत नाही असाही एक असंतोष सर्वत्र आहे. महागाई, बेकारी आणि सरकारी धोरणे याबाबत व्यापक नाराजी आहे. जुन्या पेन्शनच्या मुद्द्यावरून अमरावती विधानपरिषदेत भाजपचा झालेला पराभव हे त्याचेच उदाहरण आहे. अलिकडे अदानी प्रकरणावरून नरेंद्र मोदी यांनी काही न बोलणे आणि भाजपने हात झटकण्याचा प्रयत्न करणे हेदेखील कोणालाही पटलेले नाही. देशातील तमिळनाडू, केरळ, आंध्र, तेलंगणा, ओरिसा, पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये भाजपला लोकसभेत फार मजल मारता येईल अशी लक्षणे नाहीत. उत्तर प्रदेश विधानसभेत भाजपने गेल्या वर्षी मोठे यश मिळवले तरी विरोधी समाजवादी पक्षानेही चांगली लढत दिली होती. त्यामुळे इतर राज्यांवरही लक्ष केंद्रित केले जात आहे. महाराष्ट्रात शिवसेना फोडून अर्धे काम झाले आहे. उरलेले अर्धे पूर्ण करण्याची तयारी चालू आहे. पण भाजपने कितीही आतषबाजी केली तरी त्याला महाराष्ट्र भुलेल असे नव्हे. शिवसेनेच्या फुटीची प्रतिक्रिया झेलणे भाजपला सोपे जाणार नाही.

# राऊतांना आवरा

राजकारणात येण्यापूर्वी संजय राऊत हे गुन्हेगारी जगतावर लेख लिहित असत. भाई ठाकूर, दाऊद अशा टोळ्यांच्या आणि टोळीयुध्दाच्या बाबतीत त्यांनी लिहिलेले लेख लोक चवीने वाचत असत. दाऊदला आपण भेटलेलो आहोत आणि झापलेलंही आहे असं त्यांनी दोन वर्षांपूर्वी म्हटले होते. विशेष म्हणजे त्यांच्या खबऱ्यांचं जाळं अजूनही मजबूत आहे असं दिसतं. मुख्यमंत्र्यांच्या चिरंजीवांनी आपल्याला मारायला सुपारी दिली आहे असा आरोप त्यांनी काल केला. शिवाय, सेनेचे चिन्ह शिंदे यांना देण्यासाठी दोन हजार कोटींचा व्यवहार झाला असा भन्नाट आरोपही त्यांनी केलाय. बाकीही त्यांचे रोजचे शब्दकारंजे उडत असतेच. राऊत यांच्या हाणा, मारा, ठोकाच्या आरोळ्या शिवसैनिकांमधील वीरश्री कायम राहण्यासाठी फार उपयुक्त आहेत असा शिवसेना नेत्यांचा समज दिसतो. अर्थात, स्वतः उद्धव ठाकरे मर्दाची अवलाद, गाडून टाकू अशीच भाषा येता-जाता वापरत असतात. त्यामुळे त्यांचाही राऊतांना पाठिंबाच असावा. पण या भाषेमुळे सेनेचा किंवा महाविकास आघाडीचा काहीही फायदा होणारा नाही. उलट आघाडीबाबत जी सहानुभूती लोकांमध्ये आहे ती कमीच होण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाने धनुष्यबाण शिंदे गटाला देणे हा धडधडीत पक्षपाती निर्णय आहे असे महाराष्ट्रातील बहुसंख्यांचे मत आहे. शिवसेनेला या निर्णयाची चीड येणे स्वाभाविक आहे. पण त्यावर संयतपणे प्रतिक्रिया दिली असती तर सेनेची प्रतिमा अधिक उजळून निघाली असती. महाविकास आघाडीचे बाकीचे नेतेही याच्याशी आपला काहीच संबंध नाही अशा रीतीने याकडे पाहत आहेत. खरे तर भाजपबाबत लोकांमध्ये असलेली नाराजी संघटित करणे ही महाविकास आघाडीची गरज आणि जबाबदारी आहे. अन्यथा, त्यांचे स्वतःचेच अस्तित्व धोक्यात येणार आहे. यापैकी काहींचे भाजपशी जुळवून घेण्याचे मनोरथ असतील तर गोष्ट वेगळी. पण आता शिंदे यांच्या फुटीनंतर भाजपमध्ये बाहेरच्यांची एकच भाऊगर्दी झालेली आहे. आणखी बाहेरच्यांना त्यात जागा आहे असे वाटत नाही. दुर्दैवाने आघाडीच्या नेत्यांची तोंडे अजूनही तीन दिशांना आहेत. प्रकाश आंबेडकरांसोबत युती असो की भविष्यातील जागावाटप, हरेक मुद्द्यावर आपले मतभेद व्यक्त करायला ते उतावीळ दिसतात. खरे तर, आता शिवसेनेचे चिन्ह काढून घेण्यामुळे निर्माण झालेल्या सहानुभूतीचा लाभ आघाडीतील सर्व पक्षांना होणार आहे. त्यामुळे त्यावर काय प्रतिक्रिया द्यायची हेदेखील त्यांनी संयुक्तपणे ठरवायला हवे होते. प्रत्यक्षात राऊत हे आपले गुरु शरद पवार यांनाही जुमानत नाहीत असं चित्र दिसतं आहे. शिंदे गटाने मात्र या सर्व प्रश्नांवर अत्यंत हुशारीने प्रतिक्रिया दिलेल्या दिसतात. सेना भवन वा शाखांवर आपण कबजा करणार नसल्याचा त्यांचा खुलासा हे त्याचेच उदाहरण आहे. बहुधा भाजपची शिकवणी त्यांनी लावलेली असावी. आघाडी, सेना आणि राऊत यांनी त्यांच्याकडून हे शिकण्यासारखे आहे.

विचार

# छुपी महागाई, उघड मदत!

*काही ताज्या आर्थिक घडामोडी दखलपात्र आहेत. नवउद्योजकांना एका महिन्यात सर्व परवाने देण्याची राज्य सरकारची घोषणा लक्षवेधी आहे. सध्याच्या वातावरणात 'एलआयसी' अदानीमध्ये गुंतवणूक करणार नसल्याचे स्पष्टीकरण दिलासादायक आहे. चोरवाटेने महागाई पुन्हा दाखल होत असल्याची बातमी चिंताजनक आहे तर काश्मिरमध्ये लिथियमचे साठे आढळल्याने ईव्ही आणि मोबाईल उद्योगाला बुस्टर मिळण्याची शक्यता आहे.*

महेश देशपांडे

अर्थजगतात विविध क्षेत्रात घडलेल्या काही ताज्या घटना बोलक्या असून सामान्यांच्या जीवनावर थेट परिणाम घडवणाऱ्या नसल्या तरी दखलपात्र आहेत. नवउद्योजकांना आता एका महिन्यात सर्व परवाने देण्याची घोषणा राज्य सरकारने केली आहे. दरम्यान, सध्याच्या वादळी वातावरणात 'एलआयसी' अदानीमध्ये गुंतवणूक करणार नसल्याचे स्पष्टीकरण समोर आले आहे. चोरवाटेने महागाई पुन्हा दाखल होत असल्याची बातमी चिंताजनक आहे तर काश्मिरमध्ये लिथियमचे साठे आढळल्याने ईव्ही आणि मोबाईल उद्योगाला बुस्टर मिळण्याची शक्यता आहे.

राज्यात येणारे उद्योग इतर राज्यात जात असल्याच्या आरोपावरून गेल्या काही दिवसांमध्ये राज्यातील राजकीय वातावरण अधिक तापले असल्याचे पाहायला मिळत आहे तर नवीन उद्योजकांना राज्यात आणण्यासाठी सरकार कमी पडल्याचा आरोप सध्याचे सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर करत आहे. एकीकडे हा वाद सुरू असतानाच आता नवीन उद्योग राज्यात आणण्यासाठी प्रशासनाने जोरदार प्रयत्न सुरु केले आहेत. आता नवीन उद्योजकांसाठी राज्यात 'एक खिडकी' योजना राबवली जाणार असून एकाच ठिकाणी आणि एकाच महिन्यात नवीन उद्योजकांना परवानग्या मिळणार आहेत. आज देशाच्या जीडीपीमध्ये महाराष्ट्राचा वाटा मोठा आहे. यामध्ये निर्यात इनोव्हेशन, पायाभूत सुविधा, उद्योग, नोकऱ्या अशा सर्व गोष्टींबाबत महाराष्ट्र पहिल्या स्थानावर आहे, त्याचे श्रेय उद्योजकांना जाते. त्यामुळे यामध्ये वाढ होण्यासाठी उद्योजकांशी संवाद वाढवून एक खिडकी योजनेची पद्धत निर्माण करण्यात येत असून त्याचे लवकरच कायद्यामध्ये रूपांतर केले जाणार आहे. एक खिडकी योजनेतून नवीन उद्योजकांसाठी आणि उद्योगांसाठी लागणाऱ्या सर्व परवानग्या एकाच ठिकाणी आणि एक महिन्यात मिळणार आहेत. राज्य शासनाने प्रत्येक विभागात उद्योग व्यवसाय वाढवण्यासाठी तसेच त्याद्वारे बेरोजगारांना संधी मिळण्याच्या उद्देशाने पावले उचलली आहेत. त्याचाच भाग म्हणून किचकट अटी आणि उद्योजकांना येणाऱ्या अडचणी दूर करून जुन्या नियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी उद्योजकांकडून सूचना मागवून त्यामध्ये बदल करण्याचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, भारतीय आयुर्विमा महामंडळाने अदानी समूहाला धक्का दिला आहे. अदानी समूहात आता नवी गुंतवणूक न करण्याचा निर्णय 'एलआयसी'ने घेतला आहे. अदानी समूहाच्या शेअर्समध्ये मोठी घसरण झाली आहे. त्यामुळे एलआयसीने हा निर्णय घेतल्याची माहिती मिळत आहे. 'हिंडेनबर्ग'च्या अहवालानंतर, अदानी समूहाला मोठे आर्थिक धक्के बसत असून 'एलआयसी'च्या या निर्णयामुळे अदानी समूहाचे शेअर्स आणखी घसरू शकतात, असा अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केला. अदानी समूहाच्या समभागांमध्ये गुंतवणूक करणे 'एलआयसी'ला महागात पडले आहे, कंपनीला अनेक वाद-विवादांचा सामना करावा लागत आहे. यापूर्वी अशी चर्चा होती की 'एलआयसी'चे उच्च व्यवस्थापन अदानी समूहाशी चर्चा करणार आहे. मात्र त्याच वेळी हिंडेनबर्गचे आरोप आणि त्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीबाबत 'एलआयसी'ने आपल्या बचावात निर्णय घेणे अत्यंत गरजेचे होते. तसेच, 'एलआयसी'मधील गुंतवणूकदारांचे पैसे अडकणार नाहीत, याकडे लक्ष ठेवणे आवश्यक होते. त्यामुळे अदानी समूहातील आधीची गुंतवणूक आहे तशीच ठेवत, नवी गुंतवणूक न करण्याचा निर्णय 'एलआयसी'ने घेतला. गेल्या दोन आठवड्यांमध्ये 'हिंडनबर्ग'च्या अहवालानंतर, अदानी समूहाच्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठी घसरण झाली. यामुळे अदानी समूह आणि शॉर्ट सेलर यांच्यात कायदेशीर लढाई सुरू झाली. अदानी समूहाच्या शेअर्समध्ये मोठी घसरण झाल्यामुळे एफपीओ काढून घ्यावा लागला होता.

आता एक महत्वाची बातमी. सर्वसामान्यांना देशात सर्वत्र महागाईचा फटका बसत आहे. एकीकडे पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी होत नाहीत तर दुसरीकडे दैनंदिन जीवनाशी निगडीत वस्तूही महाग होत आहेत. 'एफएमसीजी' कंपन्यांनी दैनंदिन वापराशी संबंधित वस्तूंच्या किमती चोरपावलाने वाढवल्या आहेत. यामध्ये दूध, बिस्किटे, नाश्ता, चहा, कॉफी आणि इतर अनेक खाद्यपदार्थांच्या किमतीत वाढ झाल्याचे दिसून येते. याचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या खिशावर होत आहे. एफएमसीजी कंपन्यांनी साबण-टूथपेस्टसारख्या दैनंदिन वापरातील वस्तूंच्या किमती वाढवल्या आहेत. जानेवारी २०२२ मध्ये या वस्तूंच्या किमती तीन ते २० टक्क्यांनी वाढल्या होत्या. त्यानंतर कच्च्या मालाच्या किमतीत वाढ झाल्यामुळे ही दरवाढ केल्याचे सांगण्यात आले; परंतु या वर्षी २०२३ मध्ये एफएमसीजी कंपन्यांनी जास्त मागणी असलेल्या जवळपास सर्व वस्तू महाग केल्या आहेत. लहान मुलांच्या दुधाच्या पावडरच्या ५०० ग्रॅमच्या पाकिटाची किंमत पूर्वी ३५० रुपये होती. आता त्याचे प्रमाण ४०० ग्रॅम करण्यात आले असून दरदेखील ४१५ रुपये करण्यात आले आहेत. अनेक वस्तुंचे वजन दिवसेंदिवस कमी केले जात असून दर मात्र आहे तितकेच आकारले जात आहेत. किंमत वाढवून आणि वस्तुंचे वजन कमी करुन दोन्ही बाजुंनी पैसे उकळले जात असल्याने जनता नाराज आहे.

महागाईचा भार दिवसेंदिवस वाढत आहे. बिस्किटांच्या पाकिटाच्या वजनामध्ये सुमारे २० टक्क्यांनी घट झाली आहे. खाद्यपदार्थांव्यतिरिक्त, हात धुण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या हँड वॉश पाऊचचे वजनदेखील कमी झाले आहे. पाच महिन्यांपूर्वी बाजारात बिस्किटांचा पुडा पाच रुपयांना मिळत होता. आजही त्याची किंमत पाच रुपये आहे; मात्र वजन घटले आहे. चिप्स, नमकीनसह सर्व पॅकेज्ड वस्तूंचीही हीच स्थिती आहे. नूडल्सच्या एका पॅकेटचे दर चार ते पाच रुपयांनी वाढले असून त्याचे प्रमाण खूपच कमी करण्यात आले आहे. अवघ्या एक ते दोन महिन्यांमध्ये महागाई झपाट्याने वाढली आहे. देशात एफएमसीजी उत्पादनांची मागणी वाढली. नफेखोरी कमी केल्याचे त्यांच्याकडून सांगितले जात होते; मात्र स्थिती पूर्वपदावर आल्यानंतर कंपन्यांनी वस्तूंचे वजन कमी करून किंमती हळूवार वाढवल्याचे सांगण्यात आले.

अलिकडे पुढे आलेले एक लक्षवेधी वृत्त उद्योगजगताला दिलासा देणारे आहे. भारतात काश्मिरमध्ये लिथियमचा मोठा साठा आढळल्याची माहिती 'जियोलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया'ने दिली. यामुळे भारतातील इलेक्ट्रिक वाहने आणि मोबाइल बॅटरी निर्मिती क्षेत्राला मोठा फायदा होणार असल्याचे म्हटले जात आहे. लिथियमसाठी भारताला इतर देशांवर अवलंबून राहावे लागत आहे. या साठ्यामुळे भारत लिथियमबाबत काही प्रमाणात आत्मनिर्भर होऊ शकतो. जम्मू-काश्मीरमधील रियासी जिल्ह्यात हा लिथियम धातूचा साठा मिळाला आहे. हा साठा जवळपास ५९ लाख टन इतका असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. देशात लिथियमचा साठा उपलब्ध झाल्याने इलेक्ट्रिक वाहन क्षेत्र आणि मोबाईल फोन उत्पादन क्षेत्राला बळकटी मिळण्याची अपेक्षा आहे. लिथियम धातूचा नियमित पुरवठा राखल्यास इलेक्ट्रिक वाहननिर्मितीसाठी योजना तयार करण्यास मदत होईल. इलेक्ट्रिक वाहने आणि मोबाईल फोन यासारख्या उपकरणांसाठी बॅटरीच्या निर्मितीमध्ये लिथियम धातूचा वापर केला जातो. भारतात बॅटरी बनवण्यासाठी आतापर्यंत ऑस्ट्रेलिया आणि अर्जेंटिनासारख्या देशांमधून लिथियम आयात केले जात होते; मात्र जम्मू-काश्मीरमध्ये लिथियमचा साठा आढळल्याने परदेशातून होणाऱ्या आयातीत घट होणार आहे. लिथियमची मागणी पूर्ण करण्यासाठी आणि इलेक्ट्रिक वाहने आणि मोबाइल फोनसाठी बॅटरी तयार करण्यासाठी आता भारत जम्मू आणि काश्मीरमधील लिथियम साठ्यावर अवलंबून असणार आहे.

पर्यावरणपूरक आणि पेट्रोल, डिझेल तसेच सीएनजीवरील अवलंबित्व दूर करण्यासाठी भारतात इलेक्ट्रिक वाहनांवर भर दिला जात आहे. मागील काही वर्षांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांचे उत्पादन वाढले आहे. दुसरीकडे देशात मोबाईल फोननिर्मितीचे कारखाने सुरू करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू आहेत. चीनमध्ये कारखाने असणाऱ्या मोबाईल फोन कंपन्यांनी भारतात यावे यासाठी सरकारकडून प्रयत्न सुरू आहेत. आता भारतात, लिथियमचा साठा आढळल्याने इलेक्ट्रिक वाहने आणि मोबाईल बॅटरीनिर्मिती उद्योगाला मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे. त्याशिवाय, लिथियमची आयात कमी झाल्याचा परिणाम वाहनांच्या किंमतीवर होणार आहे. इलेक्ट्रिक वाहने आणखी स्वस्त होऊ शकतात. आयात कमी झाल्याने भारताची परकीय गंगाजळीदेखील वाचणार आहे.

आजकाल

# पाणी जिरवण्याचे योग्य मार्ग

हेमंत गोळे

मी ऐकले आहे त्यानुसार आता आपल्याकडे नवीन धरणे बांधण्यास योग्य जागा शिल्लक नाहीत. पाणी पुरवठ्याबाबत आपण काहीतरी करतो आहोत असे दाखविणे कोणत्याही सरकारला आवश्यक आहे. त्यानुसार पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री होते तेंव्हा सिमेंट साखळी बंधारे म्हणून योजना होती. देवेंद्रांनी त्याला जलयुक्त शिवार असे नाव दिले असे मला वाटते. सिमेंट साखळी बंधारे या रुक्ष नावापेक्षा जलयुक्त शिवार हे नाव आकर्षक रसाळ दिलखेचक आहे हे बहुधा सर्वजणांना मान्य होईल.

तुम्ही हा विषय काढला आहे त्याचा मी फायदा घेण्याचा प्रयत्न करतो. असा संधीसाधूपणा वाईट नव्हे असे मला वाटते. याबद्दल मला काय वाटते ते थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न करतो.

१) आपण मोसमी पावसाच्या प्रदेशामधील आहोत. हिमनद्यांपासून ज्यांमध्ये पाणी येते अशा उत्तर हिंदुस्थानातील काही नद्या सोडल्यास आपल्याकडील नद्या मोसमीच असणे अपरिहार्य आहे. २) पाऊस म्हणजे आपला नळ चालू असतो त्या काळात पाणी साठवून ठेवणे हा त्यावरील मार्ग आहे हे कोणालाही पटण्यासारखेच आहे. ३) कसे आणि कुठे साठवायचे? हा प्रश्न आहे. मोठ्या भिंतींमागे पाणी साठविणे या मार्गाचा अवलंब ब्रिटिश काळात सुरू झाला आणि त्यामधून पाण्याचे खाजगीकरण सुरू झाले. आधीचा मार्ग होता कालव्यांत/भूगर्भात साठविण्याचा. ४) पाणी साठविले की त्याबरोबर गाळ अपरिहार्यपणे साठतो आणि एक दोन शतकांमध्ये धरणभिंतींमागे पाण्याऐवजी गाळ साठतो . ५) या कारणांमुळे असेल वा वाहत्या नद्यांमध्ये फार मोठ्या भिंती बांधण्याची तांत्रिक क्षमता नसल्यामुळे असेल, पौर्वात्य समाजांमध्ये पाणी तुंबवून वर्षभर वापरणे या मार्गाचा अवलंब होत नसे. नदीमध्ये एकवटलेले पाणी बाजूच्या कालव्यांमध्ये वळविणे- पसरविणे हा पौर्वात्य मार्ग होता. भरतखंडातील यांचे ज्ञात असे सर्वात प्राचीन उदाहरण म्हणजे ग्रँड निकट ही चोल राजांनी कावेरी नदीवर केलेली योजना ! ग्रँड निकट योजना आजही काम देते आहे. त्यामुळे पुरांपासून संरक्षणही मिळते. गंगा नदीपासून शेरशहाचे काळात असे कालवे काढले गेल्याचे उल्लेख आहेत. ते कालवे त्याहून प्राचीन असू शकतांत. बर्नियर या फ्रेंच प्रवाशाचे/दाक्तराचे वर्णनावरून बंगालमध्ये देखील असे कालवे असल्याचे दिसते. अगदी लहान पातळीवर अशाच योजना फड पद्धत, पाळी पद्धत या नावांनी अस्तित्वात होत्या. बागलाण तालुक्यात सटाणे गावाजवळील तीन गावांमधील फड व्यवस्थितपणे चालू असलेले मी १९८४ मध्ये बघितलेले आहेत.परंतू या सर्वांपेक्षा मोठ्या योजना चीनमध्ये होत्या/आहेत. १९८७ पर्यंत तरी त्या चांगल्या वापरांत होत्या. आताचे माहीत नाही. फारमर्स ऑफ फॉर्टी सेंचुरीज हे एफ एच किंग या अमेरिकन शेती तज्ञांचे १९१३ साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत या सिंचन व्यवस्थेचे सविस्तर वर्णन आहे. या पुस्तकाची पीडीएफ नेटवर मोफत उपलब्ध आहे .

सिमेंट साखळी/जलयुक्त शिवार या ब्रिटिश परंपरा चालवितांत. विलासराव साळुंके यांची समन्यायी पाणी वाटप ही कल्पना पौर्वात्य परंपरेमधील - पाण्यामध्ये सर्वांना किमान वाटा देणे हे तत्व!

शिरपूर पॅटर्न मधील जलपुनर्भरणाचा मार्ग सुज्ञपणाचा आहे. विहीरींना वा विंधन विहीरींना पाणी आहे याचा अर्थ त्या जलधरांशी जोडलेल्या आहेत. त्यांचे मार्फत जलपुनर्भरण निश्चितपणे होऊ शकते.

दक्खन पठारावरील फार मोठा भूप्रदेश ट्रॅप बसॉल्ट खडकांनी आच्छादलेला आहे. या खडकांमध्ये पाण्यासाठी पार्य/अपार्य खडक हे एकावर एक रचले गेलेले असतांत. अपार्य खडक लागल्यावर त्यावर कितीही पाणी साठवून उपयोग काय? सि सा बंधारे. ज यु शि , भूसंधारणाचे विविध मार्ग - सलग समपातळी चर यांमध्ये भूशास्त्र लक्षातच घेत नाहीत. जर भूशास्त्र विचारात घेऊन किमान एक अपार्य थर भेदला गेला तर पाणी कमी प्रमाणात एकवटेल.

जलयुक्त शिवार २ ला सुरुवात करणार असे वृत्त आल्यावर मी मा मुख्यमंत्री यांस पत्र लिहून शिरपूर पॅटर्न मधील सूज्ञपणा आणि भूशास्त्र विचारात घेऊन मार्ग आखावेत असे सुचविले होते. मला पोच देखील मिळाली. प्रत्यक्षात तिकडे लक्ष दिले जाईल की नाही हे माहीत नाही.

व्हायरल

# लोकसंख्या आणि आर्थिक विकास



भारताच्या गरिबीचे सारे बिल भारताच्या लोकसंख्येवर घालणाऱ्या मध्यमवर्गीयांची संख्या खूप मोठी आहे; या लोकांचा ना डेमोग्राफीचा अभ्यास असतो ना अर्थव्यवस्थेचा;

काही करा पण लोकसंख्या कमी करा अशी एक बाळबोध मांडणी सरार्स केली जाते ; पण लोकसंख्येचा आकडा नाही तर त्यातील विविध वयोगटांचे प्रमाण अधिक महत्वाचे असते;

वयोगटांचे प्रमाण देशाची अर्थव्यवस्था रसरसलेली असणार, साकळलेली असणार की चक्क मंदीत सापडणार या गोष्टी निर्णायक पणे ठरवतात ; उदा. १५ ते ४० वयोगटातील व्यक्ती अनेक नवीन गोष्टी शिकण्याच्या मानसिक आणि शारीरिक क्षमता बाळगतात, त्यातून अर्थव्यवस्थेत उत्पादकता, स्पर्धात्मकता टिकते, वाढू शकते

४० ते ६५ पर्यंतचे नागरिक आहे ते काम नीटपणे करू शकतात, लीडरशिप, सुपरव्हिजन करतात पण उत्पादकता/नवीन गोष्टी शोधणे/ यात हा वयोगट संथ असतो.

६५ वयाच्या वरचे नागरिक अर्थव्यवस्थेत फारसे काही योगदान करू शकत नसतात. चीनमध्ये घडत असणाऱ्या घडामोडींकडे लक्ष देऊ ; त्यातून काही धडे मिळतात का ते पाहू

चीनमध्ये १५ ते ४० वयोगटातील नागरिकांचा वाटा कमी होणार आहे आणि ६५ वयावरील नागरिकांचा वाढणार आहे

चीनच्या लोकसंख्या कमी होण्यास १९८० -१९९० मधील राबवले गेलेले फक्त एक मूल धोरण कारणीभूत आहे अशी सरार्स मांडणी केली जाते ; पण ते अनेक कारणांपैकी एक कारण झाले; एकमेव नव्हे

सर्वात महत्वाचे कारण आहे, जननक्षम वयातील स्त्रियांचा सतत घटणारा जननदर

१९५० मध्ये एका स्त्रीमागे हा जननदर ६ होता तो १९९० मध्ये ३ वर आला आणि २०२० मध्ये १.१६ पर्यंत खाली आला आहे. चीनमध्ये विवाह नोंदणी ची संख्या घटत आहे, लग्नाचे सरासरी वय वाढत आहे.

याचे महत्वाचे कारण आपण किती मुलांना जन्म द्यायचा या निर्णयात चीनमध्ये स्त्रियांनी आपला न्याय्य हक्क गाजवायला सुरुवात केली आहे ; स्त्रियांचे शिक्षण , उच्च शिक्षण, स्त्रियांचा रोजगारात सहभाग, त्यांचे ग्रामीण भागातून शहरात स्थलांतर अशा गोष्टींची त्यांना मदत झाली आहे.

जाता जाता :

चीनच्या आर्थिक घोडदौडीत त्या देशातील गृहबांधणी उद्योगाचा वाटा खूप मोठा आहे; आणि नवीन घरांच्या मागणीचा/ विक्रीचा आणि तरुण मुलामुलींनी लग्ने करून, नवीन संसार थाटून, मुले जन्माला घालण्याचा एकास एक संबंध आहे.

चीनमधील डेमोग्राफिक स्थित्यंतराचा घरबांधणी क्षेत्रावर, पर्यायाने अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम येत्या वर्षात होऊ शकतो. एकच धडा; आधुनिक अर्थव्यवस्थ प्रचंड गुंतागुंतीची संरचना आहे;

नवउदारमतवादासारखी कोणी सरळसोट मांडणी करत असेल तर त्याच्यापासून दूर राहा. स्वतः समजून घ्या, स्वतः अभ्यास करा, आपसात चर्चा करा

**संजीव चांदोरकर**

लोकसंसद

## कृत्रिम प्रकाशामुळे मधुमेह ?

चीनमधील एका अभ्यासामध्ये कृत्रिम प्रकाश हा मानवाच्या आरोग्याला घातक असल्याचे दिसून आले आहे या मध्ये सर्व प्रकारचे कृत्रिम दिवे, मोबाईल लॅपटॉप सारखे गॅझेट, शोरूमच्या बाहेर असलेले एल इ डी, कारचे हेडलाईट, यामुळे मधुमेह होऊ शकतो. असे चीनमध्ये आढळून आले आहे ही बातमी नुकतीच वाचली. चीन मधील सुमारे १ लाख लोकांच्यावर संशोधन करून त्यातून असे आढळून आले आहे की असे कृत्रिम दिवे मधुमेहाचा धोका २५ टक्के वाढवू शकतात. रात्रीच्या वेळी आपल्याला दिवसाचा अनुभव देणारे दिवे माणसाचे घड्याळ बदलतात त्यामुळे साहजिकच रक्तातील साखर नियंत्रित करण्याची क्षमता कमी होते. शांघायमधील या संशोधनाचे प्रमुख डॉक्टर युजु यांनी सांगितले आहे की जगातील ८० टक्के लोकांना रात्रीच्या अंधारात प्रकाशाच्या प्रदूषणाचा सामना करावा लागत आहे. चीनमध्ये अशा प्रदूषणामुळे जवळपास ९० हजार लोक बाधित ठरले आहेत हे सर्व लोक चीनच्या १६२ शहरात राहतात. एकूणच आता अशुद्ध हवा, वाढते प्रदूषण याबरोबरच कृत्रिम प्रकाश हा सुद्धा आरोग्याला घातक ठरत आहे असे दिसू लागले आहे. आता यावर आरोग्य तंज्ञानीच प्रकाश टाकणे सुसंगत होईल.

**- शांताराम वाघ**, पुणे

प्रेरणा

## आम्ही जालों बळिवंत

तुकोबा सांगतात, आम्ही बळी राजाचे आहोत, बळी राजा आमचा आहे. आमच्याकडे समतावादी, सर्वांना बरोबर घेऊन जाणारा, अडनड सोडवणारा, आपत्तीच्या काळात मदत करणारा बळी राजा आहे. आम्ही बळीवंत झालो आहोत, आम्ही बळीवंत आहोत. आता आम्हाला घाबरण्याचे कारण नाही, भीतीचे कारण नाही.

तुकोबाने समाजास 'जन' संबोधले आहे. उतरंडीची समाजरचना अंत्यज, तळातल्या शेवटच्या कष्टकरी लोकांच्या शोषणाला पूरक असते. उच्च वर्णजातींची शोषणव्यवस्थेवर पकड होती. अंत्यज, तळातल्या माणसाने सुद्धा ती व्यवस्था स्वीकारलेली होती, तो सुद्धा त्या शोषणव्यवस्थेचा भाग बनलेला होता, समर्थक बनलेला होता. सकल समाजसुद्धा शोषणव्यवस्थेचा समर्थक होता.

शोक, मोह, क्षुधा, तृषा, जन्म आणि मरण या माणसाच्या सहा उर्मी सांगितलेल्या आहेत. तुकोबा सांगतात, या षड्उर्मींचा उपयोग करून, त्यांचा मारा करून आम्ही शोषणव्यवस्था राबवणाऱ्या जन, धन, तन शक्तींचा नाश केलेला आहे. त्यांना क्षीण केलेलं आहे, त्यांच्यात काडीचेही मूल्य राहिलेले नाही, त्यांचा काडीकचरा झालेला आहे. आता आम्ही मुक्त झालो आहोत, आमच्या माथ्यावरील गुलामीचा, पिचलेपणाचा शिक्का पुसला आहे, आम्ही स्वतंत्र झालो आहोत.

**बळियाचे अंकित ।**
**आम्ही जालों बळिवंत ।।**
**लाता हाणोनि संसारा ।**
**केला षड्उर्मींचा मारा ।।**
**जन धन तन । केलें तृणाही समान ।।**
**तुका म्हणे आतां । आम्ही मुक्तीचिया माथां ।।**


**- डॉ. विजय भगत**

# नैना विरोधात देवद-विचुंबेमध्ये बंद

*। पनवेल । वार्ताहर ।*

*सिडकोच्या नैना प्रकल्पाला पनवेल तालुक्यात विरोध होत आहे. रोज एक गाव बंद या पार्श्वभूमीवर बुधवारी (२२ फेब्रुवारी) पनवेल येथील विचुंबे-देवद गावात कडकडीत बंद पाळण्यात आला.*

सदर बंद हा शेतकरी व भूमिपुत्रांच्या हिताचा असल्याने समाजातील सर्वच स्तरातील लोकांनी व राजकीय पक्षांनी सदर बंदास भरघोस प्रतिसाद देत एक दिवसीय बंद शासकीय नियमांचे पालन करीत शांततेच्या मार्गाने पार पाडला.



आजवर अनेक प्रकल्प आले ज्यात हजारो हेक्टर जमिनी साम, दाम, दंड, भेद नीती वापरून अधिग्रहण करण्यात आल्या त्यापैकी काही जमिनींवर प्रकल्प उभे राहिले तर काही जमिनी तश्याच पडीक राहिल्या व दिलेली आश्वासनांच्या मागे प्रकल्पग्रस्त शिक्का माथ्यावर देऊन भूमिपुत्र वाऱ्यावर सोडला गेला, नैनाच्या माध्यमातून तालुक्यात पायाभूत सुविधा निर्माण होतील असे प्रतिपादन सिडको करीत असली तरी त्याकरता जवळपास दीडशेहुन अधिक गावांची जमीन ताब्यात घेण्याचा सिडकोचा मानस आहे, नैना अंतर्गत ६०% जमीन परत करू व उर्वरित जमिनीवर पायाभूत सुविधा उभारू अस जरी सिडकोचे म्हणणे असली तरी आधीची उदाहरणे बघता आम्ही कोणत्या आधारांवर जमिनी द्यायच्या ? असा सवाल शेतकरी करीत आहेत म्हणून शेतकरी विरुद्ध सिडको हा संघर्ष पराकोटीला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## चंद्रकांत मोरे यांचे निधन

**। रोहा । वार्ताहर ।**

धाटावचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत शिवराम मोरे (वय ६७) यांचे मंगळवारी (२१ फेब्रुवारी) निधन झाले.



रायगड जिल्हा प्रेस क्लबचे सरचिटणीस तथा मराठी पत्रकार परिषदेचे प्रतिनिधी शशिकांत मोरे आणि सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत मोरे यांचे ते वडील होत. दशक्रियाविधी गुरूवारी (२ मार्च) धाटाव तलाव येथे तर तेरावे उत्तरकार्य रविवारी (५ मार्च ) होणार आहेत.

## शेकापचे कार्यकर्ते धर्मा पाटील यांचे निधन

**। अलिबाग। प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाचे कुदे, ता.अलिबागचे जेष्ठ व निष्ठावंत कार्यकर्ते, सुडकोली ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य रमेश पाटील यांचे वडील धर्मा पांडुरंग पाटील ( ७२) यांचे नुकतेच वार्धक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, मुली, जावई व नातवंडे असा गोतावळा आहे.



शेकापचे जेष्ठ नेते दिवंगत बच्चूभाई मुकादम यांच्यासोबत त्यांनी पक्षाची अनेक वर्षे सेवा केली. शेकाप सरचिटणीस आ.जयंत पाटील, सुप्रिया पाटील, महिला आघाडी प्रमुख चत्रलेखा पाटील यांनी धर्मा पाटील यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले.या भेटीप्रसंगी शेकाप पुरोगामी युवक संघटना अलिबाग तालुका अध्यक्ष विक्रांत वार्डे, रामराज माजी सरपंच मोहन धुमाळ, महेश झावरे महिला आघाडी सदस्य तन्वी पाटील,श्रेया केळकर उपस्थित होते.

# नवखारच्या वृद्धेचे अलिबागेत उपोषण

**। अलिबाग। विशेष प्रतिनिधी ।**

गावातील काही लोकांपासून आपल्या जीविताला धोका आहे, त्यांच्यावर कारवाई करावी या मागणी साठी अलिबाग तालुक्यातील नवखार उर्फ डावली रांजणखार गावची एक वृद्ध महिला येथील जिल्हाधिकारी कार्यालया समोर उपोषणाला बसली आहे. पार्वती दिनानाथ पाटील असे या महिलेचे नाव आहे.

मागील काही दिवसांपासून श्रीमती पार्वती पाटील यांना गावात मानसिक त्रास दिला जात आहे. तसेच मारहाण करण्याची धमकी दिली जात आहे. त्या राहत असलेल्या घराच्या आवारातील वस्तूची नासधूस करणे,जाळपोळ करणे असे प्रकार घडले, या विरोधात त्यानी मांडवा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. मात्र आपल्या तक्रार गांभीर्याने घेतली गेली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.




१९८१ मध्ये उधानात नवखार मधील ज्या कुटुंबाचे नुकसान झाले त्यात पार्वती पाटील यांच्या कुटुंबाचा ही समावेश होता. तत्कालीन जिल्हाधिकारी शीतल उगले यांनी

बाधीत कुटुंबाना डावली रांजनखार येथील स.न ४९/0 मधील ५ गुंठे जमीन निवासी प्रयोजनासाठी त्याना शासनाने दिली असल्याचे म्हटले आहे. दरम्यान त्याना दिल्या जाणाऱ्या कथित मानसिक त्रासाला कंटाळून संबंधितांवर कारवाई व्हावी या मागणी साठी पार्वती पाटील यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे.जिल्हाधिकारी यांना त्यांनी निवेदन दिले आहे.

### आरोप बिनबुडाचे; हेमंत पाटील

उपोषणाला बसलेल्या पार्वती पाटील यांनी गावकऱ्यावर केलेले आरोप बिनबुडाचे आहेत. उलट त्यांच्या विरोधात ,त्यांचे आरोप कसे चुकीचे आहेत हे दर्शविणारे निवेदन जिल्हाधिकारी यांना सादर करणार असल्याचे डावली रांजणखार ग्रामपंचायत सरपंच हेमंत पाटील यांनी सांगितले आहे.

पान ३ वरून

## खारबंदिस्तीबाबत नौटंकी बंद करा

आता खालच्या यंत्रणेने वेळ न दवडता पावसाळ्यापूर्वी बंधारा बांधणे गरजेचे आहे,असेही ते म्हणाले. सरकारनेही या समस्येवर आता कायमस्वरुपी तोडगा काढावा.पावसाळ्यापूर्वी जर बंधारा बांधला नाही तर येथील रहिवाशांचे कायमस्वरुपी अन्यत्र स्थलांतर करावे लागेल,असेही पंडित पाटील म्हणाले. जिल्हा प्रशासनाने देखील कंपन्यांकडून मिळणारा सीआरएस फंडचा विनियोग खारभूमीच्या कामासाठी वापरावा,अशी सुचनाही पंडित पाटील यांनी केली.

## अलिबाग शिवसेनेमध्ये संताप

तरुणांचे प्रेरणास्थान असणारे शिवसेना पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांच्याबद्दल अपशब्द काढले. राज्यातील शिवसेनेच्या कार्यकर्त्यांच्या मनाला ठेच पोहोचविणारे वक्तव्य अमित शहा यांनी केले. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील जनतेमध्ये अमित शहा यांच्याबद्दल तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. देशाच्या संविधानिक जबाबदार पदावर विराजमान असलेले अमित शहा यांनी खालच्या पातळीवर भाष्य करणे शोभनीय नाही. अमित शहा यांच्या वक्त्यव्याचे पडसाद रायगड जिल्ह्यात उमटले असून जिल्ह्यातील असंख्य कार्यकर्त्यांमध्ये संताप निर्माण झाला आहे. या कार्यकर्त्यांनी जिल्ह्यातील अनेक तालुक्यात अमित शहा यांच्याविरोधात निषेध व्यक्त करीत त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करा अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे. अलिबाग येथील पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले आहे.

## घोडेवाल्यांचा संप,माथेरानला सन्नाटा

पूरक धूळ विरहित रस्त्यावरून पाय घसरून अपघात होत आहेत. क्ले पेव्हर ब्लॉकमुळे बनविण्यात आलेल्या तीव्र उताराच्या रस्त्यावरून अनेकदा घोडे पाय घसरून जखमी झाले आहेत ता काही घोड्यावरून घसरून पर्यटक जखमी झाले आहेत.ही गंभीर बाब लक्षात घेवून माथेरान मधील स्थानिक अश्वपाल संघटना आणि मूलनिवासी अश्वपाल संघटना यांनी २०फेब्रुवारी पासून घोडे बंद आंदोलन सुरू केले आहे .या दोन्ही संघटना यांनी आंदोलन सुरू केल्याने मागील दोन दिवसात ४६0 पैकी एकही घोडा रस्त्यावर आला नव्हता. पर्यटन स्थळांवर निर्माण झालेली ही परिस्थिती लक्षात घेवून माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी आणि प्रशासक सुरेखा भणगे यांनी अश्वपालक यांच्या सर्व तक्रारी बद्दल पालिकेची भूमिका स्पष्ट केली होती.ते पत्र २१ फेब्रुवारी रोजी पालिकेकडून दोन्ही अश्वपाल संघटना यांना देण्यात आले होते. पालिका प्रशासक सुरेखा भणगे आणि नगर अभियंता स्वागत विरंबोळे यांनी अश्वपाल संघटना प्रतिनिधी यांच्यासोबत सात पॉइंट सर्कलची पाहणी केली.

## उधाणाचा तडाखा

तो आणखी फुटत राहिला त्यामुळे तो आता १३0 मीटर लांब व ७ मीटर खोल झाल्याने मोठ्या प्रमाणात पाणी घुसत आहे. जमिनीची मालकी एमआयडीसीची आहे. ज्या गावांची जमीन संपादित केली त्या गावांचे खार बंधारे एमआयडीसी ने २00६ ते २0१९ पर्यंत ताब्यात घेतले न्हवते.तसेच खाजगी खारभूमी असल्याने खारभूमी विभाग त्यावर खर्च करू शकत नाही. त्यावर श्रमिक मुक्ती दलाने याबाबत सातत्याने शासन स्तरावर आवाज उठवून सरकारी यंत्रणेचे लक्ष वेधले आहे. अंधेरी येथे एमआयडीसीचे सहा. मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश सुभेदार यांच्यासमवेत बैठक झाल्यानंतर खार बांधाची जबाबदारी पहिल्यांदा १0 वर्षानंतर एमआयडीसीने स्वीकारली . बांधाची कायमस्वरूपी दुरुस्ती करायची असेल तर पोहोच रस्ते प्रथम करावे लागतील असे सुचवले कारण मूळ संरक्षक बंधारे हे मुख्य रस्त्यापासून १ ते २ किमी दूर आहेत व तेथे पक्के मटेरियल जाण्यासाठी पोहोच रस्ते हि प्राथमिक गरज आहे. पण त्या कडे २ वर्ष दुर्लक्ष करण्यात आले. तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ.विजय सूर्यवंशी यांनी पोहोच रस्ते करण्यासाठी मोठी मोहीम घेतली होती पण त्यांची बदली झाल्याने ते काम पूर्णत्वास गेले नाही. २0२१ ला शहापूर पूर्व बाजूस बंधारा फुटला तेव्हा पुन्हा मटेरियल कसे न्यायचे हा प्रश्न निर्माण झाला आणि खांड बांधण्यासाठी पोहोच रस्ता नसल्याने ही खांड आता १३0 मीटर लांब व ७ मीटर खोलीची झाली.

दरम्यानच्या काळात जेएसडब्ल्यू कंपनीच्या मदतीने पोहोच रस्ता होऊ शकतो असे तहसीलदार मीनल दळवी यांच्या लक्षात आणून दिल्यावर तसे ठरले देखील परंतु प्रत्यक्षात काहीही झाले नाही.या पार्श्वभूमीवर एमआयडीसीचे मलिकनेर आणि व डॉ. भारत पाटणकर यांचे समवेत बैठक होऊन संपूर्ण बांध पूर्णत्वास करण्याचे ठरले. त्या अनुशंगाने खारभूमी विभागाने अंदाजपत्रक बनवावे असे ठरले त्या नुसार खारभूमी विभागाने पोहोच रस्त्या सहित ११.८१ कोटी चे अंदाज पत्रक एमआयडीसीला सदर केले .दरम्यानच्या काळात पाणी थांबत नव्हते म्हणून तातडीचे उपाययोजना करण्यासाठी श्रमिक मुक्ती दल व विभाग प्रमुख यांचे सहित अप्पर जिल्हाधिकरी यांचे समवेत बैठक झाली. सदर बैठकीत कंपनीने पोहोच रस्ता व खांड या साठी स्ल्याग कार्यक्षेत्रा पर्यंत द्यावी असे निर्देश झाले ,एमआयडीसी ने पोहोच रस्त्यास परवानगी दिली पण जबाबदारी स्वीकारलेली नाही.आज त्यास ५ महिने होऊन देखील कृती झाली नाही. दर आमावस्या पौर्णिमेला पाणी येतच आहे. मत्स्यतलाव ,घरे ,झाडे पाण्य्खाली जात आहेत.जमिनी नापीक होत आहेत .त्यात कांदळ वन वाढत आहे. आमदार जयंत पाटील आमदारांनी या पोहोच रस्त्यास पाठींबा दिलेला आहे.असेही भगत यांनी सुचित केले.

## आ. साळवींची चौकशी सुरुच

रोजी १२ वाजता हजर झाले. ठाकरे गटाचे आमदार राजन साळवी यांच्या मालमत्ते बाबत रायगड लाच लुचपत विभागाने चौकशीची नोटीस डिसेंबर महिन्यात पाठवली होती. त्यानंतर आमदार राजन साळवी यांनी लाच लुचपत कार्यालयात येऊन चौकशीला हजर झाले होते. त्यानंतर २0 जानेवारी रोजी मालमत्तेची कागदपत्र घेऊन हजर झाले होते. यावेळी त्याच्या विषयी, तसेच कुटुंबियांच्या मालमत्तेची चौकशी करण्यात आली होती. आमदार साळवी यांनी सादर केलेली कागदपत्रे याचे समाधान न झाल्याने इतर कागदपत्रे सादर करण्यास लाच लुचपत विभागाने सागितले होते. त्यानुसार १0 फेब्रुवारी पर्यंत कागदपत्रे सादर करण्यास सागितले होते. आज बुधवारी दुपारी बारा वाजता आमदार साळवी यांनी अलिबाग कार्यालयात हजर राहून कागदपत्र सादर केली. मात्र उशिरापर्यंत सुरु असलेल्या चौकशीमुळे काय होतेय ते राजन साळवी बाहेर आल्यावरच कळेल.

## काशिद, दिघी, रेवससाठी रो रो सेवा लवकरच

संकुल प्रकल्पामध्ये महाराष्ट्राचे दालन असावे आणि त्याठिकाणी शिवकालीन आरमार विषयी चित्रमय प्रदर्शनासाठी राज्य शासनामार्फत सर्वतोपरी साहाय्य करण्यात येईल, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले. दरम्यान, रो-रो सेवेसाठी बंकर फ्यूलला लावला जाणारा वॅट कमी करण्यात यावा तसेच जुन्या प्रवासी बोटींचे अद्ययावतीकरण करण्यात यावे, पर्यावरणपूरक बोटींची समावेश याविषयी देखील चर्चा करण्यात आली.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-नेरळ ता.कर्जत जि.रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं | क्षेत्र चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| मे.आय एस ए. कन्ट्रक्शन तर्फे पार्टनर म्हणून इरफान हुसेन झैबी | ४0४ | ७१ | ५४0-00 | ५४=00 |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षीस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील बिनशेती मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

ठिकाणः कर्जत
दिनांक : २२/२/२०२३

ॲड.अशोक पालू डुकरे
रा.प्रभातदर्शन अपार्टमेंट
ब्लॉक नं.१0१ ममदापूर रोड
नेरळ ता.कर्जत जि.रायगड
मो.९८८१२७९८१७

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-ममदापूर ता.कर्जत जि.रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी त्यांचे खालील नमुद विद्यमान मालक यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| मयुर एच.कार्लेकर | १७५ | २३ | ५0१.६८ | ५0=१६ |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसबंध असल्यास त्यांना हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शन कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील बिनशेती मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

ठिकाणःकर्जत
दिनांकः२२/२/२०२३

ॲड.अशोक पालू डुकरे
रा.प्रभातदर्शन अपार्टमेंट
ब्लॉक नं.१0१, ममदापूर, रोड
नेरळ ता.कर्जत जि.रायगड
मो.९८८१२७९८१७

न्यायाशाखा/
जावक क्रमांक/३९३/२०२२
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,रायगड
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय, रायगड विभाग, कल्पतरू
इमारत, मुख्य पोस्ट ऑफिस जवळ,
अलिबाग, रायगड, रायगड,रायगड, रायगड
दि.२२/२/२०२३

### चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन.क्रमांक : RGD/00493/18/23
अर्ज क्रमांक : ४५/२३
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक मून एज्युकेशन अँड वेलफेयर ट्रस्ट तळोजा नवी मुंबई बाबत
न्यासाचा पत्ता : हाऊस नं. १२१0/डी, तळोजे पाचनंद पनवेल, तळोजे पाचनंद, रायगड, पनवेल, तलोदे पंचनाड (सीटी)
अर्जदार : अब्दुल मनन अब्दुल गणी पटेल.

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५0 चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत :-

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत : (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | MEMBERSHIP FEE | 2000.00 |

अ) जंगम मिळकत :- रोख रु. २000/- मात्र
(अक्षरी रुपये दोन हजार मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गाव | सी.एस.किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरुप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|

ब) स्थावर मिळकत :- रोख रु./- मात्र
(अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक २२-0२-२0२३ रोजी दिली.

सही/-
**(अंजली रमेश पिसाळ)**
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
रायगड

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मी स्वतः प्रमिला परशुराम कोळी, मु. इस्त्राईल आळी-कोळीवाडा पेण, ता. पेण जि. रायगड. मौजे. राठीची वाडी ता. पेण,जि. रायगड येथील जमिन मालक राजेंद्र गजानन पाटील रा.बळवली यांच्या मालकीची खाली वर्णन केलेली जमिन मिळकत कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तीचे वर्णन खालीलप्रमाणे

| गाव | सर्व्हे नं/गट नं. | हिस्सा नं. क्षेत्र हे.आर | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| राठीची वाडी | २४ - | २-00-00 पैकी 0-१६-00 | ८७-९८ |

वर वर्णन केलेल्या संपूर्ण जमिन मी स्वतः कायमस्वरुपी खरेदी करणार आहे.तरी वरील मिळकतीच्या बाबतील कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंधन असल्यास ही नोटिस प्रसिध्द झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवुन माझी खात्री पटवुन द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वतः मिळकतीचे रजिस्टर खरेदीखत करील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत मला बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दि.२३/0२/२0२३

सही/-
**प्रमिला परशुराम कोळी**
परशूराम धर्मा कोळी
मु. इस्त्राईल आळी-कोळीवाडा पेण ,
ता.पेण,जि.रायगड
मो.९४२0३१८0६७

### जाहिरात

माहे मार्च २०२३ ते मे २०२३ या तीन महिन्यांसाठी मत्स्यव्यवसाय विभागाकडून रायगड जिल्ह्यातील नौका मत्स्यप्रबोधिनी क्र. IND-MH-३-MM-४२६६ ही नौका प्रशिक्षण, सागरी गस्ती व सागर परिक्रमा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने चालविण्यासाठी निविदा प्रक्रियेद्वारे कराराने देण्यासाठी पात्र मत्स्यव्यवसाय संस्था/मच्छिमार/खाजगी उद्योजक यांचेकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

याबाबतचा सविस्तर तपशिल सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां.), रायगड-अलिबाग येथे उपलब्ध आहे. तरी इच्छुक निविदाधारकांची याचा लाभ घ्यावा आणि अधिकच्या माहितीसाठी शासकीय कार्यालयीन वेळेत सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां.) रायगड-अलिबाग, तिसरा मजला, सिद्धी अपार्टमेंट, पेण रोड, चेंढरे, अलिबाग-४0२२0१, दूरध्वनी क्र.0२१४२ २९५२२१ येथे संपर्क साधावा.

सही/-
**सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां.)**
**रायगड-अलिबाग**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मी स्वतः प्रथमेश प्रकाश इंदुलकर, मु. वाक्रुळ, ता. पेण, जि. रायगड मौजे. निबांरवाडी ता. पेण,जि. रायगड येथील जमिन मालक भागाबाई नामदेव साळुंखे रा.निबांरवाडी यांच्या मालकीची खाली वर्णन केलेली जमिन मिळकत कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तीचे वर्णन खालीलप्रमाणे

| गाव | सर्व्हे नं/गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| निबांरवाडी वाडी | ३१६ | - | 0-१५-५0१ | १९ |

वर वर्णन केलेल्या संपूर्ण जमिन मी स्वतः कायमस्वरुपी खरेदी करणार आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतील कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंधन असल्यास ही नोटिस प्रसिध्द झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवुन माझी खात्री पटवुन द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वतः मिळकतीचे रजिस्टर खरेदीखत करील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत मला बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दि.२३/0२/२0२३

सही/-
**प्रथमेश प्रकाश इंदुलकर**
मु. वाक्रुळ, ता. पेण, जि. रायगड
मो.९८८१२९६८६४

५५३ जा.क्र.जिउनि/कात-१0/रायन पॅलेस हौ/२0२३
दिनांक : २१-0२-२0२३

**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड यांचे कार्यालय,**
**शुक्रतारा बिल्डींग, तळमजला, कामत आळी, सतकार प्रेस समोर, ता. अलिबाग, जि. रायगड**
**दूरध्वनी क्रमांक/फॅक्स क्र. 0२१४१-२२२0१३**
ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानीव अभिहस्तांतरण(डिम्ड कन्व्हेंयस बाबत)**

**जाहीर नोटीस**

रायन पॅलेस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. मु. नागोठणे, ता. रोहा, जि. रायगड यांनी गैरअर्जदार १) विकासक व जमीन मे.एन.आर. बिल्डर अँड डेव्हलपर्स तर्फे प्रो. निसारअल्ली मनसबअल्ली चौधरी, रा. हॉटेल लेकव्ह्यू मु.पो. नागोठणे, ता. रोहा, जि. रायगड २) श्री. फरहान निसारअली चौधरी (गाळा क्र. १ व २ चे मालक) ३) श्रीमती रुबीना निसारअली चौधरी (गाळा क्र. ४ चे मालक) ४) श्रीमती फरहीन आदिल चौधरी (गाळा क्र. ६ चे मालक) २ ते ४ सर्व रा. सिसिलिया को-ऑप.हौ.सो., बी-८0४, बी.टी. कावडे रोड, घोरपडी, पुणे ४११00१ ५) श्री. श्रावण गिरधारीराम देवासी आणि श्री. ओमप्रकाश गिरधारीराम देवासी (गाळा क्र. ३ चे मालक) १0२, रायन पॅलेस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. लेक व्ह्यू हॉटेल जवळ, पो. नागोठणे, ता. रोहा, जि. रायगड ४0२१0६ ६) श्रीमती नजिमा अब्दूल रहमान अधिकारी (गाळा क्र. ५ चे मालक) गाळा क्र. ५, रायन पॅलेस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. पो. नागोठणे, ता. रोहा, जि. रायगड ४0२१0६ यांचेविरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११ (३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानीव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणेबाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**मौजे नागोठणे, ता. रोहा, जि. रायगड येथील सिटी सर्व्हे नं. ४६३, क्षेत्र ६२0.५0 चौ.मी.**

गैरअर्जदार क्र. १ ते ५ यांना नोटीस बजावणी झाली असून त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. गैरअर्जदार क्र. ६ यांचे नोटीस पाकीट 'ॲड्रेसी लेफ्ट विदाऊट इन्स्ट्रक्शन' अशा शेऱ्यासह परत झाले आहेत. दि. २१/0२/२0२३ रोजी अर्जदाराचे गैरअर्जदार क्र. ५ करिता जाहीर पेपर नोटीस बजावणीचा अर्ज मंजूर केला आहे. सबब गैरअर्जदार क्र. ६ यांना सूचित करण्यात येते की, दि. २८/0३/२0२३ रोजी सकाळी ४.00 वाजता विहीत रितीने निम्नस्वाक्षरीकार यांचेसमोर उपस्थित राहून त्यांचे म्हणणे मांडावे. तसेच वरील मिळकतीबाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावित कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे वर नमूद दिवशी उपस्थित राहून मांडावे. यात कसूर झाल्यास त्याचे काहीही म्हणणे नाही असा निष्कर्ष नोंदवून त्यांचे गैरहजेरीत एकतर्फी कामकाज करुन उचित आदेश पारीत करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २१/0२/२0२३

सही/-
**(डॉ. सोपान शिंदे)**
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, रायगड अलिबाग

दि.२२-0२-२0२३

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.बाळकृष्ण रामचंद्र भगत यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक श्री.नितीन नामदेव दांडेकर वगैरे २ याचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलास विद्यमान मालक यांनी दिला असू सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग/सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| आंबेपूर ता.अलिबाग | ११७/१ | 0-१६-८0 पो.ख.0-0१-७0 एकूण 0-१८-५0 | १.0६ |

वर वर्णन केलेली मिळकत ही जाहीर नोटीसीचा विषय आहे.

**मिळकतीचे वर्णन**

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी. कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी. हे कळावे.

**ॲड.आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु.पेझारी पो.पोयनाड
ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. नं.९२७३२७३८४३/९६३७२७00१९

**निवडक**

## श्री महागणपतीचे दर्शन

**चिरनेर :** नवी मुंबई सानपाडा येथील ज्येष्ठ नागरिक विरूंगळा संस्थेच्या वतीने मंगळवार (२१) रोजी रूपाली वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली शंभर स्त्री पुरुष ज्येष्ठ नागरिकांनी चिरनेर येथील श्री महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. यावेळी ज्येष्ठ नागरिकांच्या या उपस्थितीमुळे संपूर्ण सभा मंडप भरून गेला होता. दरम्यान दर्शनासाठी आलेल्या ज्येष्ठ नागरिकांनी श्री महागणपती विषयीची माहिती जाणून घेतली. यावेळी अनेकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

## तरुणी बेपत्ता

**पनवेल :** शहरातील कोळी वाडा येथून कामाला जाते असे सांगून घरातून बाहेर गेलेली तरुणी कोठेतरी निघुन गेल्याने ती हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. शिवाणी वाघरी असे या तरुणीचे नाव असून तिचे वय २३ वर्ष, रंगा सावळा, उंची ५ फुट २ इंच, अंगाने सडपातळ, चेहरा उभट, केस काळे व लांब आहेत. तिच्याबद्दल कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे ०२२-२७४५२३३३ क्रमांकावर संपर्क साधावा.

## सुमित काळेंची निवड

**माणगाव :** छावा प्रतिष्ठान कार्याध्यक्षपदी सुमित काळे यांची, उपाध्यक्षपदी सौरभ खैरे यांची निवड करण्यात आली तर सचिव पदी माजी उपसरपंच स्वप्नील सकपाळ, सहसचिव पदी वृषभ मोकल, खजिनदारपदी समीर सकपाळ, सहखजिनदारपदी प्रदीप लांगे, युवक कल्याण समितीपदी मंदार मढवी, शशिकांत जठार, आकाश मढवी, ओमकार गायकवाड, महेश खांडेकर, अमोल पवार, शरद शिगवण, किरण कांबळे, प्रणय माने, अभिजित मोने यांची निवड करण्यात आली आहे.

## विठ्ठलनगरात सप्ताह

**माणगाव :** मौजे श्रीक्षेत्र विठ्ठलनगर गावी श्री स्वयंभू विठ्ठल रुखुमाई वर्धापन दिन' सोहळा व हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला होता. यानिमित्ताने श्री अभिषेक, सांस्कृतिक कार्यक्रम, रांगोळी प्रदर्शन, प्रवचन, कीर्तन, हरी जागर, ज्ञानेश्वरी पारायण, पालखी मिरवणूक इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.पालखी सोहळ्यात ग्रामस्थ बंधू भगिनी व भक्तगण मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते.

## पुरस्कारासाठी माहिती

**मुंबई :** सुनिर्मल फॉउंडेशन मुंबईच्या वतीने ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त महाराष्ट्रात विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा महाराष्ट्राची रणरागिणी हा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. ५ मार्चपर्यंत आपल्या संपूर्ण कार्याची माहिती श्री दत्ता खंदारे यांच्या ९६९९३१३६२१ /९८६९३७२४९४ या नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन सुनिर्मल फॉउंडेशन मुंबई यांनी केले आहे. विविध क्षेत्रातील महिलांना हा पुरस्कार दिला जाणार आहे.

# छबिनोत्सव : कोट्यवधींची उलाढाल

### मनोरंजनासह महिला वर्गाची खरेदीसाठी झुबड; धार्मिक कार्याचा वसा आजही टिकून

। महाड । वार्ताहर ।

*दक्षिण रायगडमधील सर्वात मोठी जत्रा समजली जाणारी महाडचा छबिनोत्सव २१ व २२ फेब्रुवारीपर्यंत संपन्न झाला असून गेली आठ दिवसात करोडो रुपयांची उलाढाल झाली आहे. त्याच प्रमाणे महाशिवरात्रीपासून २२ च्या ललित कीर्तनपर्यंत धार्मिक कार्याचा वसा ज्येष्ठनागरिक याच्यासह तरुणाईकडून जपला गेला आहे. देव दैवताचे गोंधळाला तरुणाईसह महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित रहात धार्मिक भावना जपत आहेत.*

छबिण्याची रात्रच्या मोड जत्रा या दोन दिवसांच्या कालावधीत मनोरंजन पाळणे व महिला वर्गाच्या साहित्य खरेदीसाठी दुकानात झुबड पहावयास मिळत होती. विरेश्वर महाराजांच्या छबिनोत्सवातील २१ फेब्रुवारीची मुख्य रात्र विविध देवादिकांच्या पालख्या आपल्या उंचच उंच काठ्या घेऊन विरेश्वराच्या प्रांगणात आल्या होत्या. मानाची झोलाई देवीची पालखी रात्री ३.०० च्या आसपास विरेश्वर देवस्थानमध्ये आगमन होताच भक्तांकडून गजर करण्यात आला. तर बाहेर गावरान खालुबाजा व नगाराच्या तालावर तरुणाई बेधुंद नाचत मंदिर परिसरात हजारो भाविक महिला दर्शनसह खरेदीचा आनंद लुटत होती. या मध्ये बेडशीट, उशी व कव्हर, फ्लॉवर पॉट, फ्रेम, महिला वर्ग बांगड्या, कानातील, गळ्यातील शोचे दागिने खरेदी करण्यासाठी विविध दुकानात गर्दी करत होते.



जत्रेतील दुकांनासमोर खरेदीविक्रीचा जोर आणि भाविकांच्या उपस्थितीचा महापूर अशा वातावरणात पोलीस प्रशासनाची सीसीटीव्हीच्या माध्यमातून करडी नजर उत्साही व दंगा करणाऱ्या तरूणांवर टाकत होती . त्यातच भक्तीभावाने देवादिकांच्या ओटी भरण्यासाठी महिलांची लगबग विरेश्वराच्या चारही बाजूला चाललेली होती.

छबिनोत्सवामध्ये १५०० हून अधिक दुकाने आणि ३० ते ३५ विविध प्रकारचे पाळणे सामील झाले होते. त्यात आकाश पाळना, टोराटोरा होडी, ब्रेक डान्स, रेल्वे, लहान मुले व बच्चेकंपनी लहान आगीन गाडी, उड्या मारण्याच्या खेळाचा आनंद लुटत होती. तसेच पाण्यात लहान मुले आनंद लुटत होती. घरगुती शोभेच्या वस्तू मिठाईचे दुकानाच्या माध्यमातून लाखो रुपयांची उलाढाल झाली आहे.

महाशिवरात्रपासून पाच दिवस चलणार हा उत्सव गेले काही दिवसांपासून मोड जत्रेच्या नंतर वाढीव एक दिवस चालत असतो. वर्षातून एकदाच मित्र मैत्रिणी नातेवाईक याच्या समवेत मनमुराद खरेदीसाठी व मनोरंजनसाठी मिळत असल्याने गर्दी करत असतात. जत्रा संपल्या नंतर मोड जत्राच्या रात्री खरेदीसाठी गर्दी झाली होती. गेल्या काही वर्षापासून हा उत्सव अर्थकारणसह धार्मिक सलोखा जपणारा ठरला जात असल्याने अनेक व्यवसाईक दरवर्षी नवनवीन साहित्य घेऊन या उत्सवात साहित्यची विक्री करत आहेत. चाळीस पन्नास वर्षेपासून या उत्सवात येणाऱ्या अनेक व्यवसाईक आजही आवर्जून या ठिकाणी येत आहेत व आपल्यासह इतर गरजू व्यवसायीकांना सुद्धा सोबत घेऊन येत आहेत.

## जाखमाता मंदिराचा वर्धापनदिन



। अलिबाग । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील परहूर-परहूरपाडा गावातील जाखमाता मंदिराचा १४ वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त सकाळी अभिषेक, होमहवनाचा कार्यक्रम पार पडला. दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान, सकाळपासूनच पंचक्रोशितील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहात देवीचे दर्शन घेतले. रात्री जागरणाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी अनके ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी जनार्दन घरत, लक्ष्मण पाटील, नरेंद्र घरत, विकास खोपकर, सुधीर पाटील, विनोद खोपकर, अभिमन्यू नाईक, रमेश पाटील, तुकाराम गुजांळ, दिनकर बुरुमकर, दत्तराम बायगुळकर, सुनिल पाटील, मनोहर पाटील, विलास खोपकर, दत्तराम भगत आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, मंदिरास आकर्षक रोषणाई करण्याचे काम मधुकर म्हात्रे यांनी, तर देवीच्या मूर्तीला रंगरंगोटी आशिष घरत यांनी केली. त्यांचे ग्रामस्थांकडून आभार मानण्यात आले.




## पी.एन.पी. महाविद्यालयात आर्थिक साक्षरता अभियान

। अलिबाग । प्रतिनिधी ।

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील वाणिज्य व अर्थशास्त्र विभागा अंतर्गत सोमवारी भारत का आर्थिक साक्षरता अभियान या उपक्रमांतर्गत व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी

रोहित शिंदे, महेश नेमामे, संतोष पोवळे, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, प्रा. डॉ. रसिका म्हात्रे, प्रा. प्रिती पाटील, प्रा. अक्षय पाटील आणि या विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी प्र. प्राचार्य पोटे यांनी गुंतवणूक ही काळाची गरज असून विद्यार्थ्यांनी या क्षेत्रात पाऊल टाकावे ही इच्छा व्यक्त केली. तर रोहित शिंदे यांनी इन्व्हेस्टमेंट अवेअरनेस, स्टॉक मार्केट, फायनान्शिअल प्लॅनिंग अँड मनी मॅनेजमेंट याविषयी माहिती दिली. महेश मेमाने यांनी शेअर मार्केट, डिमॅट अकाउंट, शेअर ट्रेडिंग, पार्ट ऑफ ओनरशिप या विषयावर विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. तसेच मनी मॅनेजमेंट कसे करावे याविषयी मार्गदर्शन करतांना विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसनही केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रीती पाटील यांनी केले व आभार प्रा. डॉ. रसिका म्हात्रे यांनी मानले.

## अंजुमन उर्दू प्रायमरी स्कूलला मदत करणार

। अलिबाग । प्रतिनिधी ।

मुरुड येथील अंजुमन इस्लाम जंजिरा उर्दू प्रायमरी स्कूलचे नाव आणि प्रगतीचा आलेख दिवसेन दिवस वाढताना दिसत आहे. या शाळेला सर्वतोपरी मदत करण्याची ग्वाही पीएनपी शिक्षण संस्थेच्या कार्यवाहक चित्रलेखा पाटील यांनी केले.

अंजुमन इस्लाम जंजिरा उर्दू प्रायमरी स्कूल मुरुड येथे बक्षिस वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळीत्या बोलत होत्या. व्यासपीठावर अंजुमन इस्लाम जंजिरा उर्दू प्रायमरी स्कूल चेअरमन अहेमद हसन इर्फ़नशा, डॉ. निसार अहमद बिरवाडकर, प्रवीण मालादनंकर,




( छायाचित्र - अमोल नाईक )

हाफिजू कबळे, रहीम कबळे, अल्ताफ मलिक, समीर दावनाक, झाहीद गोठेकर, अझीम खानजादा, हिफझुरेहेमान नजीर, अदनान कडू, मुसवीर जमादार, डॉ. अमरीन कडू, राहील कडू, ताभीष ढहाकाम, चंद्रकांत कमाने, तुकाराम पाटील, रमेश दिवेकर, विकास दिवेकर, ॲड. मोहिनेश ठाकूर, बाबुलाल पाखरे, मुझफर दांडेकर, पालक व विद्यार्थी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

त्या पुढेम्हणाल्या की, शिक्षणाचे महत्व माणसाच्या जीवनात खूप मोठे आहे. थोर महात्म्यांनी शिक्षणाचे महत्व लोकांना, समाजाला पटवून

### चित्रलेखा पाटील यांची ग्वाही

देत देत आपले संपूर्ण आयुष्य समाजासाठी खर्ची केले. शिक्षण मनुष्याच्या बुद्धीला सत्याकडे, भावनेला माणुसकीकडे, आणि शरीराला श्रमाकडे नेण्याचे काम करते, असे त्यांनी नमूद केले. प्रत्येक व्यक्तीने आपल्या भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे. सोबतच सर्व धर्मियांनी आपापली भाषा टिकवण्यासाठी सुद्धा प्रयत्न केले पाहिजेत. सध्याचे राजकीय वातावरण गढूळ झालेले आहे, आताचे सरकार आणि त्यांची मानसिकता चुकीची आहे. चुकीचे चित्र निर्माण करून दडपशाही, स्वार्थी धोरण वापरले जात असल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

> राजकारण एका विचार धारेवर असले पाहिजे यामध्ये जातिवाद, धर्मवाद नसला पाहिजे. त्याच प्रमाणे शिक्षण आणि आरोग्यासाठी शेकाप कधीही राजकारण करत नाही. मुरुड करांच्या आरोग्यासाठी, आपल्या बांधवांसाठी संजीवनी हॉस्पिटलमध्ये माझ्या माध्यमातून जवळपास सत्तर लाखांचे डायलेसिस मशीन दिलेल्या आहेत आणि यापुढे सुद्धा शेकाप मार्फत आम्ही अंजुमन इस्लाम जंजिरा उर्दू प्रायमरी स्कूलला सर्वोतोपरी मदत करणार आहोत.
>
> -चित्रलेखा पाटील
> शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख

## अलिबागच्या विद्यार्थ्यांची भरारी

। अलिबाग । प्रतिनिधी।

डॉ. एपीजे अब्दुल कलाम सॅटेलाइट लॉन्च व्हेहीकल मिशन अंतर्गत भारतातील पहिले हायब्रीड रॉकेट महाबलीपुरम तामिळनाडू येथून यशस्वीरित्या प्रक्षेपित करण्यात आले. त्यासोबत विद्यार्थ्यांनी बनविलेले १५० उपग्रह अवकाशात यशस्वीपणे नेण्यात आले. या मोहिमेत अलिबाग तालुक्यातील विविध विद्यालयांचे विद्यार्थी सहभागी झालेले होते. त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

हे उपग्रह बनविण्यासाठी केळकर विद्यालयामधील स्वरा अविनाश पाटील (नववी), जय विश्वनाथ म्हात्रे (सातवी), आरसीएफ स्कूल कुरुळचे अवधूत संदीप वारगे (अकरावी) परी संदेश काटकर (नववी), वायशेत जि.प.शाळा मोनिका संदीप बाबर सहावी, बबिता चव्हाण (सहावी),




करण जाधव (सहावी) रिअल अकॅडमी अलिबाग शाखेच्या सिद्धी पवार (दहावी), श्रुती भंडारकर (दहावी) यांनी सक्रिय सहभाग घेतला. या मुलांना वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड, आशिया बुक ऑफ रेकॉर्ड, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड, अस्स्सीस्ट वर्ल्ड रेकॉर्ड, एकेआयएफ अशी पाच प्रशस्तीपत्रे देऊन गौरविण्यात येणार आहे. हे रॉकेट महाबलीपुरम येथून अवकाशात सोडले. हे रॉकेट प्रक्षेपित करण्यासाठी सर्व परवानग्या केंद्र आणि राज्य सरकारकडून मिळविण्यात आल्या होत्या. सदरचे रॉकेट उपग्रह अवकाशात सोडल्यानंतर पॅराशुट च्या साह्याने परत जमिनीवर लॅंड केले आणि पुढील मिशनसाठी परत वापरण्यात येणार आहे. असा प्रयोग अमेरिकेत एलोन मास्क यांनी केला

### कलाम सॅटेलाईट लॉंच व्हेईकल मिशनमध्ये सहभाग

होता. जागतिक स्तरावर विद्यार्थ्यांनी १५० पिको उपग्रह सोबत असे रॉकेट हा पहिलाच प्रयोग असल्याने अशा प्रयोगाने भारतीय विद्यार्थी अवकाश क्षेत्रात भारताचे नाव अभिमानाने नोंदवतील. भविष्यात अशा मिशन मधून डॉ. कलाम यांच्या सारखे शास्त्रज्ञ तयार होण्यास आणि नवीन विकसित भारत तयार होण्यास हातभार लागेल.

महाराष्ट्रामध्ये ह्या प्रकल्पाचे मार्गदर्शन मनिषा चौधरी, मिलिंद चौधरी करीत आहेत. महाराष्ट्रात २० जानेवारी रोजी पुणे येथे उपग्रह बनविणेची कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत संदीप वारगे यांनी मार्गदर्शन केले. जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, शिक्षणाधिकारी, श्रीमती नाखले, संतोष गावंड यांनी परिश्रम घेतले

## चिमण्या नामशेष होण्याच्या मार्गावर

। रसायनी । वार्ताहर ।

रसायनी परिसराच्या निसर्गरम्य वातावरणात काळ्या पिवळ्या निळ्या अशा विविध रंगाच्या चिमण्या घराच्या आजूबाजूच्या परिसरात सकाळच्या वेळी उडत येवून किलबिलाट करत. तर करड्या रंगाच्या चिमण्या घरामध्ये फोटोच्या तस्बरी, रिकामे कोनाडे यामध्ये वास्तव्य करत असत. परंतु मोबाईल कंपन्या व त्यांनी जागोजागी उभारलेल्या टॉवर यामुळे रामप्रहरी झोपेतून जागे होताना ऐकू येणारा चिमण्यांच्या किलबिलाटाचा आवाज जवळजवळ बंद झाला आहे.

मोबाइल टॉवरच्या रेडिओ लहरीमुळे चिमण्यासारख्या लहान पक्षांच्या अत्यंत छोट्या असलेल्या मेंदूरवर विपरीत



परिणाम होवून चिमण्यांचे प्रजनन मोठ्या प्रमाणावर कमी झाल्याने चिमण्याच्या जाती नामशेष होत आहेत. पावसाळा संपल्यानंतर भात शेतीची कापणी झाल्यानंतर या चिमण्यांना त्याठिकाणी खाद्य मिळत नसल्याने त्या वेळी नागरी वस्त्यांच्या भागात येतात. परंतु त्या पुन्हा जंगलात गेल्या नाहीत तर त्या आजारी पडून मृत्यूमुखी पडत असल्याचे चित्र दिसून येते. पर्यावरणप्रेमींनी चिमण्या वाचविण्यासाठी प्रयत्न केल्यास चिमण्यांच्या जाती वाचू शकतील.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- सुपर वायजर पाहिजे/ जेन्स मांडवा/झिराड mob- 8007893232/ 9421954348
- नागाव येथील घर व कॉटेज कामासाठी जोडपं पाहिजे, जेवण बनवणे, रूमची साफसफाई आणि वाडीच काम असणार,राहण्याची सोय आहे. संपर्क : ८४०८८२९५५५/९१५८१४१५६८.
- अकाऊंट कामाकरीता B.Com झालेली Computer चा अनुभव असलेली, अलिबागपासून ५ कि.मी. अंतरापर्यंत राहणारी मुलगी पाहिजे. कामाचा २ वर्षाचा अनुभव असावा. मोबाईल. ७४४७४०४४११, ९४२३८५४८७०, ७४४७४०४४३८
- पिंपळभाट येथे मेडिकल एजन्सीजमध्ये १०/१२ शिक्षण असलेल्या मुली/लेडिज कामासाठी हवेत. अलिबागपासून जवळ असलेल्या मुली हवेत. contanct No. 9623366778,9373747344
- स्टोअर मॅनेजर पहिजे: शिक्षण MBA-Marketing २ वर्षे अनुभव, पगार-२०,००० महिना, ठिकाण-झिराड, contanct- 9823585321
- घरकामासाठी बाई पाहिजे : ठिकाण-बामणसुरे, चोंढी, पगार-८००० महिना, contanct- 9823585321
- CNC मशीन ऑपरेटर पाहिजे : शिक्षण ITI मशिनिस्ट पगार -१०,००० महिना, ठिकाण-बामणसुरे, चोंढी contanct- 9049655523
- अकाउंटट पाहिजे: अनुभव - ४ वर्षे पगार १२००० महिना, ठिकाण-बामणसुरे, चोंढी contanct- 9823585321

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## वनवणव्यांनी शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान

। पोलादपूर । वार्ताहर ।

तालुक्यातील वनवणव्यांनी गेल्या आठवडाभरात जोर धरला असून या फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या सप्ताहामध्ये वनवणवा प्रतिबंधक सप्ताहाचे आयोजन करण्यास वनविभाग पोलादपूर परिमंडळ विसरून गेल्याने शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासंदर्भात कोणतेही प्रयत्न होत नसल्याचे दिसून आले. चोळई आणि सवाद भागासह तालुक्यात सर्वत्रच छोटया मोठया स्वरूपात वणव्यांनी घेरल्याने आंबा-काजू तसेच अन्य झाडांचे नुकसान झाले आहे.

तालुक्यातील चोळई कोंढवी फणसकोंड येथील संतोष म्हस्के यांच्या गुरांच्या गोठयामध्ये वणव्याच्या ज्वाळांचा शिरकाव होऊन दोन रेडे होरपळल्याने त्यांचे तब्बल दोन लाखांचे नुकसान झाल्याचा पंचनामा तलाठी योगेश वार्डे यांनी केला आहे. सवाद भागात लागलेल्या वनवणव्यांनी देखील ३१ शेतकऱ्यांचे



आंबा व काजूंच्या झाडांचे नुकसान झाले आहे.

तलाठी वंदना गिमेकर आणि कृषी विभागाचे कृषी सहायक बरकडे यांनी नुकसानीचा पंचनामा करून प्रस्ताव शासनाकडे सादर केले.

मात्र यावेळीदेखील पोलादपूर वन परिमंडळाचे कर्मचारी फिरकले नाहीत.

तालुक्यातीलसडवली, काटेतळी, वाकण खांबेश्वरवाडी, परसुले, क्षेत्रपाळ व दिसेधोंड-रानबाजिरे या रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये वन्यजीव सप्ताहानिमित्त बिबटे, रानडुक्कर आणि रानगवे यांच्या वावराबद्दल तसेच या वन्यजीवांपासून संरक्षणासंदर्भात माहिती देण्यात आली.कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्यामुळे पोलादपूर तालुक्यातील ग्रामस्थांना वणवे आणि तरवे याबाबत जनजागृती करण्याचा कार्यक्रम कर्मचारी संख्या घटल्यामुळे शक्य झाला नाही, असे प्रतिपादन परिमंडळ पोलादपूरचे वनपाल शाम गुजर यांनी केले.

> कर्मचारी संख्या घटल्याने वनवणवा प्रतिबंधक सप्ताहाचे आयोजन करणे शक्य झाले नाही.
> शाम गुजर
> पोलादपूर परिमंडळचे वनपाल




**चांगली चित्रे काढता येवोत न येवोत,**
**सर्व मुलांना चित्रे रंगवायला नक्कीच आवडतात.**

- यासाठीच दैनिक कृषीवल दर आठवड्याला घेणार आहे चित्रे रंगवा स्पर्धा.
- दर शनिवारी आमच्या बालरंग पानावर एक चित्र प्रसिद्ध केले जाईल.
- ते रंगवून मुलांनी दैनिक कृषीवलकडे पाठवायचे आहे. सोबत मुलांचे व पालकांचे पूर्ण नाव, पत्ता, शाळेचे नाव, पत्ता कळवायचा आहे.
- यातील उत्कृष्ट चित्रे कृषीवलमधून प्रसिद्ध केली जाणार आहेत.

**चित्रे पाठविण्याचा पत्ता - कृषीवल कार्यालय, वेश्वी-अलिबाग.**

**निवडक**

## जावयासाठी सासरे धावले

**कराची** : नवी दिल्ली, केएल या वादात भारताचे दोन माजी खेळाडू एकमेकांविरूद्ध उभे ठाकले आहेत. व्यंकटेश प्रसादने केएल राहुलला संघातून बाहेर काढत शुभमन गिलला संधी देण्याची मागणी केली आहे. तर समालोचक आकाश चोप्राने केएल राहुलला अजून संधी मिळावी यासाठी त्याची पाठराखण केली. यादरम्यानच केएल राहुलचे सासरेबुवा सुनिल शेट्टी यांनी आकाश चोप्राचे ट्विट लाईक करत जावयाला पाठीशी घातले.

## टाटा समूह प्रायोजक

**सुकेळी** : महिला प्रीमियर लीगसाठी टाटा ग्रुप प्रायोजक टायटल स्पॉन्सरही जाहीर करण्यात आले आहेत. टाटा समूह आधीच आयपीएलचा टायटल स्पॉन्सर आहे. आता अशा परिस्थितीत बीसीसीआयने महिला क्रिकेटला चालना देण्याची जबाबदारीही टाटा यांच्यावर सोपवली आहे. डब्ल्यूपीएलचा उद्घाटन हंगाम ४ मार्चपासून मुंबईत सुरू होत आहे. बीसीसीआय सचिव जय शाह यांनी ट्विट करून ही माहिती दिली.

## सानियाचा अलविदा

**नवी दिल्ली** : भारतीय टेनिस स्टार सानिया मिर्झाने टेनिसला अलविदा केले. डब्ल्यूटीए दुबई ड्यूटी फ्री चॅम्पियनशिपमध्ये आपला अखेरचा सामना खेळली. सानियाने २००३ साली व्यावसायिक टेनिसमध्ये पदार्पण केले होते. तिने तिच्या कारकिर्दीत सहा ग्रँड स्लॅम, मिश्र दुहेरीत तीन ग्रँडस्लॅम जेतेपदे पटकावली. महेश भूपतीसह दोन जेतेपद जिंकली, ब्रुनो सोरेससह यूएस ओपनचे विजेतेपदही पटकावले.

## अजित चंडिलाला दिलासा

**मुंबई** : आयपीएल स्पॉट फिक्सिंग प्रकरणात आजीवन बंदीचा सामना करणाऱ्या अजित चंडिला यांना बीसीसीआयने दिलासा दिला आहे. लोकपाल विनीत शरण यांनी चंडिलावरील आजीवन बंदी सात वर्षांची केली आहे. भारताचा माजी वेगवान गोलंदाज एस. श्रीशांत आणि अंकित चव्हाण यांच्यासह अजित चंडिलावरही स्पॉट फिक्सिंगचा आरोप होता. यामुळे चंडिला आता काही वर्षात पुन्हा खेळू लागेल.

## प्रथमेश जावकरची निवड

**कैरो** : इजिप्तमधील कैरो येथे सुरु असलेल्या जागतिक नेमबाजी स्पर्धेतील १० मीटर एअर रायफल प्रकारात सुवर्णपदकावर ठाणे येथील नेमबाज रुद्रांक्ष पाटील याने मोहोर उमटवली. हे त्याचे या स्पर्धेतील दुसरे सुवर्णपदक ठरले. रुद्रांक्ष पाटील याने सोमवारी १० मीटर एअर रायफल मिश्र सांघिक प्रकारात आर. नर्मदा नितीन हिच्या साथीने त्याने सुवर्णपदक पटकावले होते. त्याच्या यशाचे सर्वत्र कौतूक होत आहे.

**महिला विश्वचषक स्पर्धा**

# पाकच्या पराभवाने भारताचा मार्ग खडतर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**महिला टी-२० विश्वचषकात इंग्लंडने पाकिस्तानवर ११४ धावांनी मोठा विजय नोंदवला. पाकिस्तानच्या या दारुण पराभवाचा सर्वाधिक फटका भारताला बसला आहे. कारण जर पाकिस्तान संघाने इंग्लंडला मोठ्या फरकाने पराभूत केले असते, तर इंग्लंडचा संघ भारतापेक्षा ६ गुणांनी कमी नेट रन रेटसह दुसऱ्या स्थानावर पोहोचला असता. अशा परिस्थितीत भारत ब गटातील अव्वल ठरला स्थानी राहिला असता.**

ज्यामुळे भारताचा सामना अ गटातील दुसऱ्या उपांत्य फेरीतील दक्षिण आफ्रिकेशी झाला असता. ज्यांना लीग टप्प्यात ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडकडून पराभव पत्करावा लागला होता. मात्र पाकिस्तानच्या मानहानीकारक पराभवाने सर्व समीकरणे बदलली असून आता भारताचा सामना विजयाच्या रथावर स्वार असलेल्या ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. ज्यांनी या स्पर्धेत एकही सामना गमावला नाही.

भारताने पहिल्या सामन्यात पाकिस्तानचा ७ विकेटने पराभव केला होता. वेस्ट इंडिजचा ६ गडी राखून पराभव केला होता, पण तिसऱ्या सामन्यात इंग्लंडने त्यांचा ११ धावांनी पराभव केला. यानंतर, शेवटच्या साखळी सामन्यात, संघाने डकवर्थ-लुईस पद्धतीनुसार आयर्लंडचा ५ धावांनी पराभव केला.ऑस्ट्रेलिया हा स्पर्धेतील अ गटातील पहिला संघ ठरला आहे, ज्याने त्यांचे चारही साखळी सामने जिंकले आहेत. ब गटात इंग्लंडने हा पराक्रम केला. पहिल्या सामन्यात




ऑस्ट्रेलियाने न्यूझीलंडचा ९७ धावांनी पराभव केला होता. दुसऱ्या सामन्यात बांगलादेशचा ८ गडी राखून पराभव केला. श्रीलंकेच्या संघाचा १० गडी राखून धुव्वा उडवला. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेचा ६ गडी राखून पराभव करून उपांत्य फेरीतील स्थान निश्चित केले.

पाकिस्तान आणि इंग्लंड दरम्यान झालेल्या सामन्यात नाणेफेक जिंकून इंग्लंडने प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता. त्यामुळे इंग्लंडने ५ गडी गमावून २१३ धावा केल्या होत्या, याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तान २० षटकांत ९ विकेट गमावून केवळ ९९ धावा करू शकला. उपांत्य फेरीत दाखल झालेला इंग्लंड गट दोनमध्ये अपराजित आहे.

**उपांत्य फेरीतील संघ -**

**भारताने चारपैकी तीन सामने जिंकले आणि गट दोनमध्ये सहा गुणांसह दुसरे स्थान पटकावले. गुरुवारी उपांत्य फेरीत त्यांचा सामना ऑस्ट्रेलियाशी होईल, त्यांनी गट एक मधील सर्व चार सामने जिंकून आठ गुणांसह पहिले स्थान मिळवले. दुसऱ्या गटात इंग्लंडने चारही सामने जिंकल्याने त्यांचे आठ गुण आहेत. उपांत्य फेरीत त्याची लढत गट एक मधील दुसऱ्या स्थानावरील संघाशी होईल.**

# कोकण विभागीय जलतरण चषक स्पर्धा उत्साहात

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

कर्नाळा स्पोर्टस क्लब येथे स्वीम ॲण्ड स्पार्कचे मदन कटेकर याच्या संकल्पनेतून कोकण विभागीय जलतरण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटन उपजिल्हाधिकारी संदीप कदम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष मुकुंद म्हात्रे, संचालक डॉ. प्रकाश पाटील, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, तालुका क्रीडा मार्गदर्शक मनिषा मानकर, कॅप्टन. उदय सुर्वे या सर्व मान्यवरांच्या उपस्थित होते.



छत्रपती शिवाजी महाराज जलतरण चषक - २०२३ स्पर्धेत पोहण्याच्या फ्री स्टाईल, ब्रेस्टस्ट्रोक, बॅकस्ट्रोक, बटरफ्लाई अशा प्रकारात विविध आठ वयोगटातील एकूण ५०७ पेक्षा जास्त स्पर्धकांनी भाग घेतला. स्पर्धेचे बक्षीस वितरण आम. जयंत पाटील, कळंबोलीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक निशिकांत विश्वकार, माजी नगरसेवक गणेश कडू, प्रा. प्रशांत माने, प्राचार्य, विकास चव्हाण, श्री. लाटे ,मदन कटेकर, संचालक, स्विम एन स्पार्क. आदी मान्यवर उपस्थित होते. सदर स्पर्धा यशस्वी करण्याकरिता प्रा. जयवंत माने, किशोर पाटील, सचिन शिंगरूट, निळकंठ आखाडे, हितेश भोईर, ओमकार कोळी, सार्थक पाटील, अनिकेत सुपाले, पियुष नाथी, मितेश पाटील, संदीप यादव, गणेश गाडगे सचिन जामले, अमित मौले, प्रशांत ठाकूर, संकेत म्हात्रे, समर्थ नाईक, ऋग्वेद पाटील, प्रज्ञा मोडकर, कैलास आखाडे, निशिकांत पवार, चंद्रशेखर पाटील, अविनाश लोखिनले या सर्वांनी पंच व इतर ऑफिसर्स म्हणून काम पाहिले. स्पर्धेसाठी किरण मढवी, समीर रेवाळे, प्रा. रेखा धवन, शिल्पा कटेकर आणि सृष्टी कटेकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

**स्पर्धेतील विजेते**

**१.मास्टर्स पुरुष गट दीपक ठाकूर,
मास्टर्स महिला गट हेमांगी गावंड,
२.खुल्या पुरुष गटात सुचित पाटील,
खुल्या महिला गटात- स्वराली म्हात्रे,
३. १७ वर्षा खालील मुले -शुभम जोशी,
१७ वर्षा खालील मुली रिया शर्मा.
४. १४ वर्षा खालील मुले, अथर्व पाटील,
१४ वर्षा खालील मुली, दक्षाजा देव उपरती
५. १२ वर्षा खालील मुले, शंतनु कैचे,
१२ वर्षा खालील मुली,अमिता रुद्रा.
६. १० वर्षा खालील मुले,
रायान सय्यद,
१० वर्षा खालील मुली,
निधी सामंत.
७. ०८ वर्षा खालील मुले,
प्रिन्स काठावळे,
०८ वर्षा खालील मुली,
माही जांभळे.
८. ०६ वर्षा खालील मुले,
इब्राहिम खान,
०६ वर्षा खालील मुली, नायरा पटेल**

# केळुसकर महाविद्यालयाचा क्रीडा महोत्सव

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

कोकण एज्युकेशन सोसायटीचे चं. ह. केळुसकर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयाच्या क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन प्राचार्य व स्टुडंट कौन्सिलचे चेअरमन डॉ. आर. जे. जैन यांच्या उपस्थितीत क्रीडा ज्योत प्रज्वलीत करून झाले. यावेळी महाविद्यालयाच्या आजूबाजूच्या गावांमध्ये अवयव दान, रक्तदान, एड्स याबाबत जनजागृतीपर फेरी काढण्यात आली .

२६ फेब्रुवारी पर्यंत चालणाऱ्या क्रीडास्पर्धेत क्रिकेट, क्यारम, ब्यांटमिंटन, धावणे, रिले रस्सी खेच टेबल टेनिस, बुद्धिबळ, गोळाफेक, थाळीफेक, लांब उडी आदी विविध स्पर्धा घेण्यात येणार आहेत.




या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. आशिष भगत, क्रीडा प्रमुख डॉ. आनंद नाईक, स्टुडंट कौन्सिलचे व्हाईस चेअरमन डॉ. साक्षी पाटील व डॉ. कविसा पाटील, महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. नम्रता ठाकूर , डॉ. कलिका देवकाते, डॉ. स्वप्ना शिंदे, डॉ. आरती गंभीर, डॉ. सूरज पाटील, आणि स्टुडंट कौन्सिलचे जनरल सेक्रेटरी तन्मय पेडणेकर, लेडीज रिप्रेझेन्टेटिव्ह भाग्यश्री धाटावकर, स्पोर्ट्स सेक्रेटरी कौस्तुभ पाटील व पायल पाटील, सुहानी राणे यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. क्रीडा स्पर्धेनंतर २७ फेब्रुवारी ते ३ मार्च पर्यंत विविध सांस्कृतिक कार्यक्रम होणार असून १० मार्च रोजी वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.



# संयुक्ता हुजरेचा पीएनपीतर्फे सत्कार

**। अलिबाग । वार्ताहर ।**

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा विभागातर्फे गुणवंत विद्यार्थिनीचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी महाविद्यालयाच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील उपस्थित होत्या.

यावेळी महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. रसिका म्हात्रे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. रवींद्र पाटील व प्रा. पल्लवी पाटील यांसमवेत महाविद्यालयाचे सर्व विभागीय प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक, संयुक्ता हुजरेचे आई - वडील व महाविद्यालयातील विद्यार्थी या ठिकाणी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाविद्यालयातील विद्यार्थिनी संयुक्ता हुजरे हिच्या हस्ते एन.एस.एस ध्वजारोहण करण्यात आले.



( छायाचित्र - अमोल नाईक )

२६ जानेवारी २०२३ रोजी दिल्ली येथे झालेल्या मुख्य परेड करिता तिची रायगड जिल्ह्यातून निवड करण्यात आली होती. संयुक्ता हुजरे हिचा सन्मान सोहळा चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

चित्रलेखा पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून संयुक्ता हुजरे हिस पुढील वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन ऋतुजा गायकवाड यांनी केले.

# जेएस व्हिजन अलिबाग यू ट्यूब चॅनल



**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

अलिबाग येथील अनुज जितेंद्र शिगवण या तरुणाने जेएस व्हिजन अलिबाग (JS Vision Alibag) या नावाने कार्यक्रमांच्या यू ट्यूब वरील लाईव्ह प्रक्षेपण व्यवसायात पदार्पण केले आहे. त्यांचे औपचारिक उद्घाटन अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ड गौतम पाटील, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे कार्याध्यक्ष प्रदिप नाईक, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या स्पर्धा समितीचे सदस्य प्रकाश पावसकर, ॲड. महेश मोहिते, रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, अलिबाग प्रेस असोसिएशनचे उपाध्यक्ष जितेंद्र शिगवण, रायगड फोटोग्राफर ॲन्ड व्हिडिओग्राफर असोसिएशनचे उपाध्यक्ष समीर मालोदे, अलिबाग प्रेस असोसिएशन चे माजी अध्यक्ष रमेश कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनी अनुज शिगवण यांचे कौतुक करत तरुणांनी बदलत्या काळानुसार व्यावसायिक बदल घडवण्याची अपेक्षा व्यक्त करीत त्यांना शुभेच्छा दिल्या.

**डोंगरपट्टा प्रिमियर लीग चषक**

# एम के ब्रदर्स संघाने जिंकला

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरानच्या आदिवासी खेळाडूंसाठी डोंगरपट्टा आदिवासी प्रीमियर लीग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रीमियर लीग मध्ये एम के ब्रदर्स संघाने विजेतपद पटकावले.

बेकरे येथील चोंडिचामाळ येथे डोंगरपट्टा पिमियर लिग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या डोंगर पट्टा प्रीमियर लीगमध्ये एकूण आठ संघांनी सहभागी झाले होते. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात एम.के. ब्रदर्स संघाने पी.ची. नयना सुपरकिंग संघाला पराभव करत विजेतेपद पटकावले.



स्पर्धेत तिसरा क्रमांक आदित्य इलेव्हन संघाने आणि चौथा क्रमांक अरोशी इलेव्हन संघाने पटकावला. असलचे माजी सरपंच देऊ सांबरी तसेच प्रवीण पाटील, शिवराम कराळे, नारायण पारधी यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. आदिवासी क्रिकेट असोसिएशनच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा पार पडली.

**प्रिन्सी कानपोली संघ**

# उसर्ली सरपंच चषकाचा मानकरी

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल तालुक्यातील उसर्ली गावात दर वर्षीप्रमाणे यंदाही शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत सरपंच चषकाचे आयोजन करण्यात आले होते. उसर्ली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विश्वास भगत यांच्या माध्यमातून या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या सामन्याचे उदघाटन भारतीय क्रिकेटर शिवम दूबे, माजी आ.बाळाराम पाटील, विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, आ.निलेश लंके, रेल्वे संघाचे क्रिकेट सागर जाधव या प्रमुख पाहुण्याच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत ३६ संघानी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे प्रथम पारितोषिक अथर्व प्रिन्सी कानपोली संघाने पटकवले. त्यांना रोख रक्कम २ लाख व भव्य चषक देऊन गौरवण्यात आले. दुसरा क्रमांकाचे रोख रक्कम १ लाख व भव्य चषकाचे बक्षीस श्रीदत्त भाताण या संघाने पटकवला. ६० हजार रुपये व भव्य चषकाचे तिसरा क्रमांकाचे बक्षीस आर. सी सी. पेठ संघाने तसेच ४० हजार व चषकाचे चौथे बक्षीस सागर सम्राट भवरा यांनी पटकावले. या सामान्याच्या माध्यमातून खेळाडूंना पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन मिळेल असे मत सामन्याचे आयोजक माजी सरपंच विश्वास भगत यांनी व्यक्त केले.



**विभागीय प्रीमियर लीग स्पर्धेत**

# सारा,साई, मायरा ईलेव्हन विजेते

***। सुकेळी । वार्ताहर ।***

***ऐनघर विभागीय प्रीमियर लीग २०२३ (पर्व ३ रे) चे आयोजन शनिवार दि.१८ व १९ फेब्रुवारी असे दोन दिवस करण्यात आले होते. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात सारा,साई, मायरा ईलेव्हन या संघाने कोकळे वॉरियर्स या संघाचा पराभव करत विभागीय प्रीमियर लीग २०२३ चा मानकरी ठरला.***

स्पर्धेचे उद्घाटन सरपंच कलावती कोकळे व मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. या स्पर्धेत सहा संघानी सहभाग घेतला होता. संघमालक सुधीर ढाणे, मनोज हारपाल व संदेश ढाणे यांच्या सारा,साई, मायरा संघास रोख ५१ हजार रुपये व आकर्षक चषक तर उपविजेता ठरलेला संघमालक राजेंद्र कोकळे व जगन कोकळे यांच्या कोकळे वॉरियर्स या संघास रोख ३१ हजार रुपये आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.

तृतीय व चतुर्थ क्रमांकाच्या अनुक्रमे टायगर इलेव्हन व देवांश व प्रसन्न इलेव्हन




या संघास आकर्षक चषक देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच या स्पर्धेचा मालिकावीर ठरला तो साई, सारा, मायरा इलेव्हन संघाचा संदेश ढाणे (डॅनी), सामनावीर विकी हारपाल, शिस्तबद्ध संघ जय हनुमान वेताळवाडी, पब्लिक हिरो रवि यादव, तर सिक्सर किंग संदेश ढाणे यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

या बक्षिस वितरण समारंभाला किशोर जैन, संजय भोसले, विजय कसबे, सुधीर ढाणे, राजेंद्र कोकळे, किशोर नावले, विठ्ठल इंदुलकर, काशिराम ढाणे, जीवन अग्रवाल, जगन कोकळे प्रीमियर लीग अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी, खजिनदार व सर्व पदाधिकारी व क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)